# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्री साईनाथ वाचनालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

**श्रीसाई वाक्सुधा**

(वर्ष ६० वे) किंमत एक रुपया (अंक ६ वा

सप्टेंबर १९८१

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर. मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

बाबा कितींदा सांगून गेले ।
कोणी कोणास छद्मीं बोललें ।
त्यानें माझेंच वर्म काढिलें ।
जिव्हारीं खोच मज जाण ॥१७४॥

कोणीं कोणास दुर्वचें ताडिलें ।
तेणें मज तात्काळ दुखणें आणिलें ।
तेंच जेणें तें धैर्यें सोशिलें ।
तेणें मज तुष्टविलें बहुकाळ ॥१७५॥

ऐसा भूत मात्राच्या ठायीं ।
अंतर्बाह्य भरला साई ।
एका प्रेमावाचून काहीं ।
आवडच नाहीं तयातें ॥१७६॥

परम मंगल हें परमामृत ।
साईमुखीं सर्वदा स्रवत ।
कोणास भाग्या हें नाहीं अवगत ।
प्रेम अत्यंत भक्तार्थ हें ॥१७७॥

जयां पंक्तीचा लाभ दिधला ।
जयां संगे हांसला खेळला ।
तयांस मायेचा चटका लाविला ।
वाटेल मनाला काय त्यांचे ॥१७८॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ४४ वा



श्री अष्टविनायक स्मरणं


स्वस्ति श्रीगणनायकं
गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं ।
बल्लाळं मुरुडं विनायक मढं
चिंतामणीं थेवरं ॥
लेण्यांद्रि गिरिजात्मकं
सुवरदं विघ्नेश्वरं ओझरं ।
ग्रामें रांजण संस्थिते गणपतिं
कुर्यात् सदा मंगलं ॥

# अनुक्रमणिका—सप्टेंबर १९८१


१) संपादकीय — मी जन्मुनी केले काय
२) श्री मनोहर माणिक प्रभु महाराज — साईनंद
३) गाठीभेटी — साईनंद
४) श्रीसाईबाबांची लेंडीबाग — सदानंद चेंदवणकर
५) साधक–साधना–साध्य — डॉ. रा. सि. कापडी
६) तरी मी धावेन भक्तांसाठी — प्रा. एच. बी. महाले
७) लीलामय श्रीसाईकृष्ण — श्री. चकोर आजगावकर
८) बाबांची उदी–एक शास्त्रीय सत्य — श्री. सुरेश सालपुते
९) श्रीसाईनाथ सहाय्या धावती — कु. अरुणा प्रभू
१०) सुख असे तुमचे हाती — श्री. महादेव भिडे
११) कै. श्रीधर जनार्दन दिवे — श्री. वि. स. महाबळेश्वरकर
१२) श्रीसाईसच्चरित आणि व्यवहारी शिकवण — श्री. माधव गजानन गोरे
१३) उदीचा महिमा — श्रीमती मथुराबाई हिबारे
१४) श्रीसाईनाथांचा कृपाहस्त — श्री. आत्माराम घोलेकर
१५) तुमचे श्रीसाईबाबाबद्दल सामान्यज्ञान किती ? — कु. शालीनी देशपांडे
१६) बाबांच्या कृपेने ऑपरेशन टळले — सौ. शीला नाईक
१७) बाबा सदैव भक्तांचे पाठीराखे — श्री. सी. बी. पाटील
१८) शिरडीवृत्त जुलै १९८१ —

# मी जन्मुनि केले काय ?

मनुष्य प्राणी जन्मतो वाढतो व मोठा होतो. शारीरिक बौद्धिक, मानसिक सामर्थ्य कमावतो, विद्या कला शिकतो, धंदा व्यवहार करून द्रव्य मिळवितो, विवाह




करून संसार करतो. स्त्री-पुत्रांचे पालन करतो आणि देवाची कृपा झालीच तर वृद्ध होतो, क्षीण होतो व एक दिवस या सर्वांचा निरोप न घेताच अवचितपणे या आपणच मांडलेल्या पसाऱ्यातून निघून जातो. पण या सर्व व्यवहारापासून तो काय कमाई करतो. मनुष्य या सर्व दृश्य सृष्टीमधून अदृश्यामध्ये जातो त्यावेळी स्वतःबरोबर आपण काय नेऊ शकू हा विचार कधी त्यांच्या मनात आला आहे का ? की आयुष्यभर काबाड-कष्ट करून तो दुसऱ्यासाठी वेठीच्या बिगारीसारखाच राबत असतो.

आपणाला ईशकृपेने या देहाची प्राप्ती झाली आहे; ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये लाभली आहेत. त्यांचे कार्य व्यवस्थित चालावे असे सामर्थ्यही मिळाले आहे. आम्हाला मन, बुद्धि, विवेक यांची साथ मिळाली आहे. या सर्व दुर्लभ गोष्टींची जोड मिळूनही त्यांच्यापासून आम्ही आपला कोणता फायदा करून घेतला आहे ? आपण जन्माला आलो त्या वेळेपासून मरेपर्यंत अति भाग्याने लाभलेल्या या नर-देहाच्या विविध व्यापारांमुळे शेवटी हा देह सोडताना आपल्या हिशेबी काय जमा असणार ? की शेवटी अदृश्यामधून या दृश्य सृष्टीमध्ये आलो तसेच एक दिवस फिरून अदृश्यामध्ये मिळून जावयाचे ? आपण आपणाला अमूल्य आणि ज्याचा लाभ आपल्या स्वाधीन नाही अशा या मनुष्य देहाचा जो लाभ झाला आहे, त्याचे काही सार्थक करावे साधन म्हणून त्याचा उपयोग करून श्रेय गाठावे असा विचार करून या मोलाच्या आयुष्याचे काही चीज केले आहे का ?

आपल्या सभोवती अनंत सृष्टी आपण पहातो. यामध्ये जड सृष्टी आहे तशीच चेतन सृष्टीमध्ये असंख्य प्रकारचे जीव आहेत. जमिनीवर राहणाऱ्या जीवांप्रमाणेच काही जीव पाण्यातील आहेत तर काही आकाशामध्येही भ्रमण करू शकतात. भूचरांमध्ये काही चतुष्पाद तर काही सरपटणारेही आहेत. जीवसृष्टीतील विविध प्रकारच्या या प्राण्यांशी मनुष्याचा तुलनात्मक विचार केला तर तो किती वरदानां

-शक्ती साधनांनी संपन्न आहे हे ध्यानात येईल. हा असा अमूल्य नरदेह आपणाला अवचितच केवळ एक योगायोगच म्हणून मिळाला आहे का? ज्ञाते तर सांगतात की, 'महता पुण्यपण्येन क्रीतेयं कायनौस्त्वया' पुण्यरूपी फार मोठी किंमत देऊन आपण हा दुर्लभ नरदेह विकत घेतला आहे. हा नरदेह म्हणजे साधनसंपत्तीचे एक मोठे भांडारच आहे.

'या नरदेहाचे नि आधारे। नाना साधनाचे द्वारे।
सारासार विचारे। बहुत सुटले।"

असे समर्थ रामदास स्वामी यांचे सांगणे आहे. असा हा बहुमोली नरदेह लाभूनही फिरून अविवेकाने वागून आपण दुष्ट नष्ट कुकर ( कुत्रा ) सुकर ( डुकर ) योनीत जाऊन चौऱ्यांशी लक्षाच्या फेऱ्यात पडावे का? असा प्रश्न विचारून स्वामी समर्थ सांगतात–

'नरदेहाचे उचित। काही करावे आत्महित।
यथानुशक्त्या चित्त वित्त सर्वोत्तमी लावावे॥"

नरदेहाच्या तीन अवस्था मानल्या गेल्या आहेत. बालपण, तारुण्य आणि वृद्धावस्था. बालपणी मनुष्याला विचारशक्ती कमीच असते. त्यामुळे बालपणी मनुष्य फुलपाखराप्रमाणे बागडण्यातच आयुष्य वेचतो. क्षणाचाही विचार त्याच्या मनात येत नाही. बुद्धीचे मार्गदर्शन मनाला नसल्यामुळे मनुष्याचे व्यवहार या अवस्थेमध्ये दिशाहीन उद्देशहीन असतात. एक प्रकारे सुखदुःखाच्या खेळातील तो एक स्वतःच खेळणं बनतो.

तारुण्यामध्ये शक्ती–संपत्तीचा धूर मनुष्याच्या डोळ्यावर चढून तो आंधळा बनतो. विवेकहीन होतो. अनेक रंगांनी रंगलेल्या नयन मनोहर इंद्रधनुष्याप्रमाणे मोहकतेच्या विविध छटांनी नटलेल्या मायाजालामध्ये तो फसतो; काम आणि कामिनीचा तो गुलाम बनतो. तो लोभाला बळी पडतो. क्रोधाची शिकार होतो, मोह मदाने धुंद होतो आणि मत्सराने त्याचे हृदय जळू लागते. सुखासाठी म्हणून तो प्रयत्न करतो पण ते सुख मृगजळाच्या पाण्याप्रमाणेच त्याच्यापासून दूर पळते अशाच स्थितीत तो शेवटी हीन दीन बनून तो पतित होतो.

"ईशदत्त शक्ति उदरपोषणीं। विषयभोगी करतो काय।
आणि त्याचसाठी तो बनतो
निंदक बहु खल पापिष्ठ आणि करतो अति अन्याय॥"

यातच पुढे वृद्धावस्था येते. वृद्धावस्थेमध्ये मनुष्याच्या निरनिराळया शक्ति दिवसे दिवस कमी कमी होत जातात, बुद्धि मंद होते आणि शरीर विकलांग होते त्याचा उत्साह मावळतो व हौस नष्ट होते. अशा स्थितीमध्ये पुढील विचार न करता तो गतायुष्याचेच चिंतन करीत रहातो आणि त्यामुळे अनेक वेळा त्याला भ्रमहि होतो, म्हणून जीवित साफल्यांचा विचार करणे त्याला अशक्य बनते. मग पश्चातापपूर्वक तो स्वतःच म्हणतो—

'मी जन्मुनि केले काय ।
व्यर्थ शिणविली माय । '

मानवी जीवनामध्ये तारुण्य हाच महत्वाचा भाग आहे. हाच काळ मनुष्याच्या कर्तबगारीचा काळ होय. या कालामध्ये केलेला कोणताहि उपक्रम अधिक जोमदारपणे होऊन तो अधिक यशस्वीहि होतो. विद्या कला संपादन करणे, धंदाव्यवहार करून द्रव्य कमावणे गृहस्थाश्रम स्वीकारून कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदारी पार पाडणे, आणि मानवी जन्माचा विचार करून आपणाला लाभलेल्या या अमूल्य नरदेहाचा एक साधन म्हणून उपयोग करणे व आयुष्याचे सार्थक करून परमार्थ साधणे या गोष्टी याच कालामध्ये मनुष्याने साधल्या पाहिजेत. शक्ति, संपत्ति व आपणाला भाग्याने लाभलेली अन्य विविध साधने यांचा मुसमुसणाऱ्या तारुण्याच्या मदाने धुंद होऊन कामक्रोधादि दुर्जय षड्‌रिपुपुढे बळी न देता 'धरिला देहाचे सार्थक करीन' अशा विवेकपूर्वक निश्चयाने आत्मकल्याण साधण्याचा प्रयत्नहि याच कालामध्ये केला पाहिजे.

मानवी देहाला बाल्य, तारुण्य वार्धक्य अशा तीन अवस्था असतात. परंतु प्रत्येक मनुष्याला तीनही अवस्था लाभतातच असे नाही म्हणून एक हिंदी संत-कवि म्हणतात.

'पानी तेरा बुदबुदा असी मानुस की जात ।
देख तही छिप जायगा ज्यों तारा परभात ॥ '

कारण मृत्युरूपी व्याघ्राची झडप त्यावर कधी पडेल हे सांगता येणार नाही. म्हणूनच,

'काळ चोर घिरट्या बहु घाली ।
पामर तुज कशी निज आली ।
जाग जाग स्वरूपी लवलाह्या ।
जातसे वय अमोलिक वाया ॥'

असे संत वचन आहे. याचसाठी मनुष्याने आत्मकल्याणाचा विचार नेहमीच केला पाहिजे. स्वामी स्वरुपानंद सांगतात—

करावा विचार । आपला आपण ।
कोण मी कोठुन । जन्मा आलो ॥ १ ॥
देहांती मागुती । कोठे जाणे असे ।
काय विश्व कैसे । होय जाय ॥ २ ॥
कर्म ते करावे । कोणते उचित ।
पावे आत्महित । कैशापरी ॥ ३ ॥
क्षणो क्षणी ऐसा । करावा विचार ।
कैसा भवपार । पावेन मी ॥ ४ ॥

असे विचार मनात येऊ लागले म्हणजे हळूहळू मनुष्याला परमार्थाची ओढ लागू लागते. मनुष्याच्या आत्मोद्धाराची ही पहिली पायरी आहे. परिसाचा स्पर्श झाला म्हणजे लोखंडाचे सोने होते. त्याचप्रमाणे मनुष्याला एकदा आत्महिताची ओढ लागली की त्याचे सारे जीवनच बदलून जाते. त्याच्या दृष्टिमध्ये आणि कर्मामध्ये फरक पडतो. या सांसारिक, मायिक गोष्टी त्याला निस्सार वाटू लागतात, व तो अनंताचा शोध घेऊ लागतो. अशावेळी त्याला त्याच्या भाग्याने सद्गुरुचा लाभ झाला तर त्याच्या आयुष्याचे सोने होते स्वामी स्वरुपानंद म्हणतात—

'सापडले मज अंतरी निधान ।
सद्गुरु-चरण उपासिता ॥'

'जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूती ।' अशा तऱ्हेचे माय-बाप कृपावंत संत सद्गुरु दावानलामध्ये फसलेल्या हरिणीप्रमाणे मायेच्या मोहजालातील फसवणुकीची जाणीव होऊन पश्चात्तापाने तडफडणाऱ्या साधकाना मुक्तीचे मार्गदर्शन करतात. जगामध्ये विविधकाली विविध स्थळी श्रीसाईबाबांसारख्या सद्गुरुंनी अवतार धारण करून पतित जनांचा उद्धार केला आहे.

जयंती निमित्य खास लेख

# सकलमताचार्य श्री मनोहर माणिक प्रभु महाराज

—साईनंद

● श्रीसद्गुरु माणिक प्रभुमहाराज २९ नोव्हेंबर १८६५ रोजी माणिकनगर येथे समाधीस्थ झाल्यावर त्यांचे चिरंजीव श्री. मनोहर माणिकप्रभु महाराज यांना शास्त्रोक्त रीतीने सोळाव्या दिवशी यथासांग गादीवर बसविण्यात आले. त्यावेळी त्यांचे वय अवघे सात वर्षांचे होते. प्रभुंची गादी चालविण्यासाठी त्यावेळी माणिकनगरपासून जवळच असलेल्या भालकी येथे मच्छिंदरराव नावाचा एक तरुण होता व तो निस्सीम प्रभुभक्त होता, व गादी चालविण्यास तो सर्वथा योग्य आहे अशी अनेक प्रभूभक्तांची कल्पना होती. प्रभुजी पण त्याचे खूपखूप लाड करीत असत.



श्री माणिक प्रभुंच्या अखेरच्या दिवसात त्यांच्यासाठी एक स्वतंत्र गादी करण्यात आली व त्यांना प्रभू सन्निधआणून गादीवर बसविण्यात आले. पण मच्छिंदररावांच्या दुर्दैवाने त्यादिवशी अकस्मात् त्या गादीला आग लागून ती खाक झाली. माणिकनगर संस्थान हे फकिरी संस्थान आहे. चाळीस हजार रुपयांचे त्यास कर्ज आहे तेव्हा संस्थानची कारकिर्द जर आपल्याकडे आली तर आपणास दुसऱ्यांची कर्जे देण्याच्या प्रसंगांना तोंड द्यावयाचे आहे या प्रश्नाने मच्छिंदररावांची छाती दडपून गेली होती त्यामुळे त्यांनी माणिकनगरातून आपला पाय उचलला होता. प्रभूंच्या अखेरच्या क्षणी सुद्धा त्यांना निरोप पाठवून बोलावण्यात आले होते पण ते किंवा त्यांच्या पक्षाचे कुणीच आले नाही.

आपले चिरंजीव मनोहर माणिकप्रभु उर्फ आप्पासाहेब यांची योग्यता श्री माणिक प्रभुंना माहित होती पण हा फार दिवस रहाणार नाही पण सवाई माणिकप्रभू मात्र नक्कीच म्हणून येईल अशी त्यांची खात्री होती आणि म्हणून त्यांनी मनोहर प्रभूंनाच आपल्या गादीचे वारसदार करून टाकले.

श्री मनोहर प्रभू उर्फ आप्पासाहेब पाच वर्षांचे असतानाच एकदा दरबारात प्रभूंची येण्यापूर्वी ते प्रभूंच्या गादीवर बेऊन बसले; व गंभीर स्वरूप त्यांनी धारण केले. जमलेल्या लोकांनाही या गोष्टीचे कौतुक वाटून सर्वांची दृष्टी त्यांच्यावर खिळून गेली. इतक्यात प्रभूंची स्वारी आली व आपली गादी मनोहरने बळकावलेली पाहून ते म्हणाले, बेट्या मनोहरा, माझी गादी तुला पाहिजे काय रे? पण बाळ गादीवर बसल्यास हे अंगावरचे सर्व दागिने दुसऱ्याला द्यावे लागतात हे तुला ठाऊक आहे काय? त्यावर आप्पासाहेबांनी चटकन उत्तर दिले, "आपण सांगाल त्याला हे सर्वच्या सर्व दागिने देऊन टाकतो." असे म्हणुन त्यांनी सर्व दागिने लगेच काढून ते प्रभूपुढे ठेवले. मुलाचे हे गुण पाहून प्रभू संतुष्ट झाले व त्यांनी आपल्या शेजारीच एक खास गादी मांडून त्यावर त्यांना बसविले.

आपल्या पाठीमागे माणिकनगर संस्थानचा कारभार मोठेपणा व संप्रदायपरंपरा चालविण्यास मनोहर अल्पवयस्क असले तरी ते समर्थ आहेत अशी प्रभूंची खात्री होती. श्रीमाणिकप्रभूंच्या नंतर मनोहर प्रभू जेव्हा गादीवर आले तेव्हा कुणाकुणाचे किती कर्ज आहे व ते किती किती देणे आहे याची यादी त्यांनी तयार केली व त्या त्या शेट सावकारांना बोलावून आणण्यास आपले प्रधान कारभारी मंत्री बापाचार्यांना सांगितले. जवळ पैसा नसताना छोटे महाराज धनकोंना बोलावून आणा असे सांगतात याचे सर्वांनाच आश्चर्य वाटले. पण महाराजांच्या आज्ञेनुसार सर्वांना पत्रे गेली. किसनगिर नावाचा कल्याणचा एक गोसावी होता तो आला पण तो म्हणाला, महाराज प्रभूंना कर्ज देण्याची माझी काय योग्यता? उलट प्रभूंच्या आशिर्वादाने मला लक्षावधी रुपयांचा फायदाच होत आहे. आमच्या जवळ पैसा असूनही आमच्या हातून दान धर्म होत नाही तो प्रभूंकडे पैसे गेल्याने होतो. म्हणुन हे पैसे मी दिले. जरी होते तरी ते माझे कर्ज नव्हे आणि ते आपण द्यावे अशी माझी मागणी पण नाही. याप्रमाणे बऱ्याचशा सेठजींनी महाराजांकडून कर्जाऊ दिलेली रक्कम परत घेण्यास नकारच दर्शविला. बालमहाराजांच्या या कर्तबगारीवर सगळेचजण खूष झाले.

श्री मनोहर माणिक प्रभूंचे संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते. त्यांनी सकलमत संप्रदाय, पुजा पद्धती त्यांनीच तयार करून संप्रदायाला मूर्त स्वरूप आणले प्रभु समाधी-

वरील देऊळ त्यांनीच तयार केले. त्यांचा स्वभाव गोड होता. त्यांचे भक्त त्यांच्या तेजस्वी चेहेऱ्याकडे बघून चकीत होत असत. त्यांना योगाभ्यासाची खूप आवड होती, सर्व व्यवहार ते अगदी नियमितपणे करीत असत. त्यांचे भाषण मृदु होते व त्यात विनोदाची छटा असे. ते कधी कुणावरही रागावले नाहीत. त्यांचा आहार सात्विक होता. विद्वान लोकांवर त्यांचे प्रेम होते व विद्वानांना भरपूर देणगी व वस्त्र प्रावरणे देऊन ते संतुष्ट करीत असत. त्यांना कविता करण्याची भारी आवड होती. त्यांनी पुष्कळ पदे रचलेली आहेत. त्यांनी ओवीबद्ध प्रभू चरित्र लिहिले. त्यांनी अशाप्रकारे अल्पवयात संस्कृत व प्राकृत साहित्याची निर्मिती केली यावरुन त्यांना श्रीज्ञानेश्वराची उपमा दिल्यास ती योग्यच होईल यात अतिशयोक्ती नाही.

श्रीमनोहर माणिक प्रभु महाराज मातृभक्त होते. त्यांनी शेवटपर्यंत नैष्ठीक ब्रह्मचर्य पाळले. त्यांच्या औदार्यादी अनेक गुणांच्या कथा सांगितल्या जातात. आपला आजार बरा करणाऱ्या हैद्राबादच्या लोकाबापू वैद्याला त्यांनी भरपूर द्रव्य व उंची वस्त्रे देऊन पाठविले. आपल्या गळयातला प्रभूंनी दिलेला एकमुखी रुद्राक्षही त्यांनी लोकाबापूला देऊन टाकला. लोकाबापूला तो हवा होता ही त्यांची इच्छा मनोहर प्रभुंनी अंतर्ज्ञानाने जाणली होती.

श्रीमनोहर प्रभूंनी संस्थानचे काम सुव्यवस्थित चालवून प्रभूंच्या कीर्तीत आणखीन भरच घातली. प्रभूंनी सुरू केलेले सर्व उत्सव त्यांनी चालू ठेऊन ते पाळले. मनोहर प्रभूंनी विवाह करावा अशी माता बिठाईची इच्छा होती. आपली वडील भगिनी मुक्ताबाई हिचे लग्न त्यांनी मोठ्या थाटाने करून दिले. आपले कनिष्ठ बंधु खंडेराव यांचेही लग्न त्यांनी बापाचार्यांच्या मुलीबरोबर लावून दिले; त्यावेळी खंडेराव महाराजांचे वय बारा वर्षे होते.

आश्विन कृष्ण सप्तमी शके १७९९ म्हणजेच रविवार ता. २८ ऑक्टोबर १८७७ रोजी महाराजांना एकाएकी दोन उलट्या झाल्या. सर्व लोक घाबरून गेले पण महाराजांनी धीर देऊन सर्वांना शांत केले. विधीपूर्वक आश्रम घेऊन त्यांनी आपल्या मातोश्रींना नमस्कार केला. खंडेरावांना उपदेश केला व देहविसर्जन केला. त्यावेळी त्यांचे वय १९ वर्षांचे होते. माणिक नगर संस्थानच्या क्षितिजावर चमकणारा एक तेजस्वी तारा अशाप्रकारे अनंतात विलीन झाला. त्यांच्या जन्मतिथी निमित्ताने त्यांना कोटी कोटी प्रणाम—

साईभक्तांच्या गाठीभेटी......५३

# न्यायमूर्ती श्री. मखिजानीसाहेब व त्यांची शिर्डी भेट

● साईनंद



श्रीसाईबाबा संस्थानचा कारभार इ. सन १९६० सालापासून महाराष्ट्र राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली मुंबईच्या सिटी सिव्हिल कोर्ट यांचेमार्फत चालू आहे. या सिटी सिव्हिल कोर्टाचे न्यायमूर्ती यांचे मार्गदर्शनाखाली संस्थानचे कोर्ट रिसिव्हर आजतागायत काम पहात आहेत. १९६८ सालापासून १९७९ साल अखेर सिटी सिव्हिल कोर्टाचे लोकप्रिय न्यायमूर्ती श्री. एन. के. पारिखसाहेब श्रीसाईबाबा संस्थानच्या एकंदरीत कारभाराकडे जातीने लक्ष देऊन वेळोवेळी सल्ला व मार्गदर्शन संस्थानच्या न्यायालयधारकांना देत होते. पण त्यांची नेमणुक मुंबई उच्च न्यायालयात झाल्याने त्यांचे जागी न्या. श्री. म. स. रत्नपारखी यांची नेमणूक करण्यात आली पण थोड्याच दिवसात त्यांना बढती मिळाल्याने त्यांचे जागी न्या. श्री. ए. ए. काझीसाहेब यांची नेमणूक करण्यात आली पण लौकरच त्यांचीही अन्यत्र नेमणूक झाल्याने त्यांचे जागी सिटी सिव्हिल आणि सेशन कोर्टाचे न्यायाधिश श्री. नरी इडनमल मखिजानी यांची नेमणूक करण्यात आली. पारिख साहेबांचे नंतरचे नेमणुक झालेले दोघेही न्यायमूर्ती नेमणूकीपूर्वी किंवा नेमणूकीनंतरही श्रीबाबांच्या शिर्डीक्षेत्री जाऊन आलेले नाहीत पण न्या. मखिजानी साहेबांची नेमणूक झाल्यानंतर मात्र ते लगेच शिर्डीला जाऊन आले आहेत.

न्या. नरी मखिजानीसाहेब मूळचे हैद्राबादचे. त्यांचा जन्म २१ मे १९२९ रोजी हैद्राबाद येथे झाला. त्यांचे वडील श्री. इडनमल हे हैद्राबाद येथे व नंतर पुण्यात इनकमटॅक्स प्रॅक्टिशनर होते. १९६१ साली ते दिवंगत झाले. मातोश्री पारबती या १९७२ त स्वर्गवासी झाल्या. नरीसाहेबांचे हायस्कूलचे शिक्षण हैद्राबादच्या नवलराय हिरानंद हिंदु हायस्कूलमध्ये झाले. पुढे तिथल्या नॅशनल कॉलेजातून पुढील व

मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजातून ते एल. एल. बी. झाले. १९५० ते १९७६ मार्चपर्यंत त्यांनी मुंबईत सिटी सिव्हिल व स्मॉल कॉजेस कोर्टात वकीली केली. १९७६ साली त्यांची नेमणूक सिटी सिव्हिल कोर्टात न्यायाधिश म्हणून करण्यात आली व आता त्या जबाबदारीच्या जोडीला श्रीसाईबाबा संस्थानला मार्गदर्शन करण्याचीही जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली आहे व ती ते मोठ्या आनंदाने स्वीकारीत आहेत. कारण त्यांना श्रीसाईबाबांच्याबद्दल पूर्वीपासूनच प्रेम वाटत आले आहे. माहिमचे साईभक्त श्री. लिमये बाबांचे ते स्नेही असल्याने बाबांच्या दर्शनाकरिता ते तिथे अनेकदा गेले आहेत. आणि आता तर संस्थानच्या कारभाराचे मार्गदर्शकच ते असल्याने बाबांनीच त्यांना ही संधी आपोआप आणून दिली आहे असे म्हटल्याशिवाय रहावत नाही. नेमणूक झाल्यावर ते जून १९८१ मध्ये शिरडीला जाऊन पण आले. यापूर्वी ते १९७६ साली ते प्रथम शिरडीला गेले होते. त्यानंतर १९७८ साली व आता काल परवा जूनमध्ये ते जाऊन आले, बाबांचे दर्शन घेऊन आले.

आपण पाहिलेल्या सर्व तीर्थक्षेत्रात शिरडी क्षेत्राचे वातावरण आपल्याला फार आवडले. भक्तीभावनेला पोषक असेच वातावरण तिथे असल्याने बाबांच्या विषयीची भक्ति भावना अधिक दृढतर होते. तेथील साराच कर्मचारी वर्ग आपापली जबाबदारी ओळखून काम करीत असल्याने भक्तांच्या उसळत्या गर्दीला यशस्वीपणे तोंड देऊन त्यांची सेवा करीत आहे असे श्री. मखिजानीसाहेब सांगतात.

पण ! पण ! आज शिर्डी क्षेत्री वाढत जाणाऱ्या भिकाऱ्यांच्या संख्येने आपल्याला परेशान केले आहे. भिकाऱ्यांच्या बरोबरीनेच महारोग्यांची संख्यापण तिथे वाढत आहे व हे असेच जर चालत राहिले तर या सुंदर क्षेत्राची हानी होईल असे आपणाला वाटते असे जजसाहेब सांगतात.

मग हा भिकाऱ्यांचा कूट प्रश्न कसा सोडवावा ? त्यांच्या वाढत्या संख्येला कसा प्रतिबंध करावा ? या प्रश्नावर ते सांगतात की, संस्थानने त्यांना एकत्रित करून त्यांचेसाठी एक लहानशीच वसाहत बांधून द्यावी. त्यांची भोजनाची सोय पण तिथे विनामूल्य करावी व या मोबदल्यात चांगल्या धडधाकट भिकाऱ्यांकडून अंगमेहनतीची कामे करवून घ्यावीत. हा प्रश्न सोडविण्याचे बाबतीत आणखीन जर कुणी भक्त मंडळींनी काही सूचना केल्या तर त्याबाबतीत आपण नक्कीच विचार करू असे न्यायमूर्तीसाहेब म्हणतात.

श्री. नारी मखिजानी यांचा विवाह १९५६ साली मुंबईमध्ये झाला. त्यांच्या पत्नी सौ. ज्योती देवी या साईभक्त आहेत. ज्येष्ठ कन्या सोनिया बी. कॉम आहे तर

त्याच्यानंतरचा दिपक हा बी. कॉम परीक्षेचा तिसऱ्या वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करीत आहे नि छोटी रविना इंग्रजी ५ वीत आहे. गुल नावाचे एकच धाकटे बंधू मखिजानींना असून ते आपल्या वडीलांचा इनकम टॅक्स प्रॅक्टिसचा व्यवसाय करतात. आपल्या फावल्या वेळात कथा व कादंबरी वाचनाचा आपल्याला छंद आहे. इंग्रजी हिंदी प्रमाणेच उर्दू व पर्शियन भाषांचेही आपणास ज्ञान आहे व त्या भाषेतली पण पुस्तके आपण वाचतो असे ते सांगतात.

बाबांच्याकडून पुन्हा शिर्डीला येण्याचा 'कॉल' येईपर्यंत तरी आपले काही शिरडीला जाणे होणार नाही पण असे असले तरी संस्थानच्या विकास कार्यात आपण अधिकाधिक लक्ष घालून बाबांची सेवा करू असे जाता जाता त्यांनी उद्गार काढले.

## श्रीसाईबाबा संस्थानचे अभिषेक पुजारी
## कै. दिवाकर पुरुषोत्तम भालेराव



यांच्या चिरंतन स्मृतीस
आमचे अभिवादन

समस्त कर्मचारी
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

भक्तांसाठी नवी माहितीपूर्ण लेखमाला...५

# श्रीसाईबाबांचे तपोवन—लेंडीबाग

—सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

श्रीसाईबाबांच्या समाधीमंदिरापासुन जवळच विशेषतः गुरुस्थानापासून सुमारे पन्नास पावलांवर पश्चिमेकडे एक छानदार बाग आहे. या बागेला लेंडी बाग असे म्हणतात. या बागेत वाटसरू आणि भक्त रमत गमत असतात. थकलेल्या-भागलेल्या जीवांचे ही वाटिका म्हणजे विश्रांतीचे स्थान होय. या संपूर्ण बागेचा परिसर एक एकर जागेने व्यापलेला आहे. श्रीसाईबाबा द्वारकामाईतून निघून या बागेत रोज निदान दोन वेळा तरी जात असत. सकाळी ते येथे शौचविधीस जात असत. बाबांच्या वेळेस येथे आंबे, तरवड, निंब, पिंपळ व औदुंबर अशी झाडे होती या झाडांना बाबा स्वतः घागरीने पाणी आणून घालीत असत. येथील ही पाच झाडे म्हणजे पाच 'अ'कार होत. आम्र (आंबे), अंबर (तरवड), अरिष्ट (निंबवृक्ष) अश्वत्थ (पिंपळ), औदुंबर (उंबर) हे येथील पाच 'अ'कार वृक्ष मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. अंबुरातील (तरवड) 'अ'कार म्हणजे विष्णु, औदुंबरातील 'उ'कार म्हणजे शंकर मालकतरुतील (निंबवृक्ष) 'म'कार म्हणजे ब्रह्मदेव. आम्र तरुतील 'अ'कार म्हणजे अर्ध मात्रा, बोधिद्रुमातील (अश्वत्थ, पिंपळ वृक्ष) 'व'कार म्हणजे अर्धमात्रेवर असलेला ब्रह्मकालरूप, बिंदुरूप. तेव्हा कृष्ण परमात्म्याप्रमाणे 'अ'कार उकार, मकार, अर्धमात्रा व बिंदू मिळून 'ॐ'कार रूपाने श्रीसाईबाबा ॐकार स्वरूप श्रीगणपतीच्या रूपाने सदैव वास येथे करीत आहेत अशी भक्तांची श्रद्धा आहे.

श्रीसाईबाबांच्या वेळी या बागेतून एक नाला वहात जात होता त्याचे नाव लेंडी. उन्हाळयात या नाल्याला फार थोडे पाणी असे. असे सांगतात की या नाल्याच्या पात्रात बाबा नेहमी चांदीची नाणी फेकत असत. श्रीसाईबाबांनी याच लेंडीबागेत आपले एक परम भक्त श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे उर्फ पुरंदरे काका यांना अत्यंत तेजस्वी, त्यांचे डोळे दिपवून टाकणारी व अत्यंत जड अशी तीन सोन्याची वेटोळी काढून दाखविली होती ती केवळ त्यांचे मन पहाण्यासाठी म्हणून. या बागेत बाबा एका अश्वत्थ (पिंपळ) झाडाच्या बुंध्याजवळ तास तास बसत असत. रोज सकाळी ९ च्या सुमारास भक्तमंडळी बाबांना लेंडी बागेवर वाजत गाजत नेत असत. तिथे गेल्यावर त्यांना या तपोवनात सोडीत व पुन्हा ११-१२ वाजता भक्तमंडळी

बाबांना आणण्यासाठी जात व वाद्यांच्या जयघोषात परत त्यांना मशिदमाईत–द्वारका माईत आणून सोडीत असत.

या लेंडी बागेच्या संदर्भात एक कथा सांगितली जाते ती अशी–कै. रावबहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान हायकोर्ट वकील सांताक्रुझ मुंबई हे बाबांचे एक परमभक्त होते. ते १९१० साली प्रथमच शिरडीत गेले. बाबांनी त्यांना शिरडीस आठ दिवस ठेऊन घेतले. त्यांनी घरी जाण्याची परवानगी मागितली की, काय आपण रानात आहोत, जाऊ संध्याकाळी असे बाबा म्हणत. संध्याकाळी विचारले की 'उद्या पाहू' असे म्हणत. असे आठ दिवस गेले. या आठ दिवसाचे काळात एका गुरुवारी बाबा लेंडीवरून परत येऊन एक तास झाला होता त्यावेळी भक्त नानासाहेब चांदोरकरांचे दोन मुलगे बाबू, बापू व प्रधानजी बाबांचे पाय चेपणे चालले असता. नाच तिथे गेले त्यावेळी बाबा प्रधानांना म्हणाले, 'भाऊ, चल मजसंगाती' व एकदम उठले. बाबा, बापू, बाबू व प्रधान चारही जण या लेंडीबागेकडे आले. मे महिना होता तो. भर दुपारी बाबा लेंडीबागेकडे आले व वडाच्या झाडाखाली उभे राहिले. त्यावेळी ही बाग अगदीच ओसाड होती. बाबा म्हणाले, 'भाऊ इकडे ये' बाबांनी त्यांच्या खिशात हात घातला व काही दाणे प्रधानांच्या हाती दिले व म्हणाले, हे घे व तूच त्या जागेवर फेक आणि मग स्वतः टमरेलातून पाणी आणून ते त्यांनी त्यावर शिंपडले. ही वार्ता शिरडी गावात पसरली व बरीच मंडळी लेंडीबागेत आली. 'घाला या दाण्यावर पाणी' तेव्हा सर्व भक्तमंडळींनी पाणी घातले व सर्वजण मशिदीत परतली बाबांच्या या कृतीचा अर्थ त्यावेळी कुणाला समजला नाही. पण पुढे याच प्रधानसाहेबांनी ही लेंडीबागेची जमीन कै. तात्या कोते पाटील यांच्या सहाय्याने विकत मिळविली व शिरडीतील खानावळवाले श्री. सगुण मेरू नाईक यांच्या दीर्घ मेहनतीने ही फळाफुलांची बाग केली आहे. लेंडीबागेच्या प्रवेश द्वारावरच 'प्रधान लेंडीबाग' अशी पाटी आज लावलेली आढळते. या बागचे रहस्य हेच आहे.

आजच्या लेंडीबागेच्या प्रवेश द्वारासमोर एक लंब वर्तुळाकार सुंदर कारंजे आहे. या कारंजाच्या मध्यभागी आकाशाकडे मान वळवून चोच उघडलेल्या राजहंस पक्षाचे शिल्प आहे. या राजहंस पक्षाच्या उघड्या चोचीतून कारंजातील पाण्याचे तुषार थुईथुई उडत असतात. कारंजाच्या सभोवती मुलायम हिरवळ आहे. उत्सव काळात रात्रीच्यावेळी या कारंजावर रंगीबेरंगी प्रकाश झोत टाकले जातात. यामुळे या कारंजाच्यातील उडणाऱ्या पाण्याच्या तुषारांची शोभा मोठी खुलून दिसते.

या कारंजाच्या उत्तरेस व लेंडीबागेच्या बाहेरच्या कंपौंड भिंतीला लागूनच संस्थानचे बांधकाम विभाग प्रमुख श्री. डी. सी. पाटील यांची कचेरी आहे. या कचेरीच्या जवळ लागूनच संस्थानचे विद्युत गृह आहे. येथला विजेचा दाब ४४०

व्होल्ट इतका आहे. या विद्युत गृहाच्या लगतच पुढील बाजूला चार समाध्या आहेत. अलीकडील काळात म्हणजे सुमारे पाच वर्षापूर्वी या समाधी स्थानावर उत्तम प्रकारचे सिमेंट कॉंक्रीटचे सुंदर बांधकाम करण्यात आले आहे. विशेषतः समाधी स्थानावरील आच्छादने आधुनिक पद्धतीची करण्यात आलेली आहेत.

पहिली समाधी जी आहे ती श्री. भाऊ महाराज कुंभार यांची. ते मिती चैत्र वद्य १२ रोज बुधवार शके १८६० रोजी, इंग्रजी दिनांक २०-४-१९३८ रोजी साईचरणी विलीन झाले. ते बाबांचे परम व निष्ठावान भक्त होते. त्यांचेकडे रस्ते झाडण्याचे काम होते.

दुसरी समाधी आहे ती श्रीनानावल्ली महाराजांची. ही खरोखरच एक वल्ली होती. कधी कधी ते बाबांना आपल्या आसनावरून उठवून त्या जागी स्वतः बसत असत. पण काही वेळाने त्यांना पुन्हा उठवून त्या जागेवर त्यांना बसवीत व त्यांच्या चरणावर मस्तक ठेवीत. ते बाबांचे एक मुसलमान भक्त होते. श्रीबाबांचे निर्वाण झाल्यावर बरोबर चौदा दिवसांनी म्हणजे २८ ऑक्टोबर १९१८ रोजी ते पैगंबर वासी झाले.

तिसरी समाधी आहे ती श्री. अबदुल बाबांची. लहानपणी अबदुल नांदेडच्या अमिरुद्दीन फकीराकडे नोकरीस होता. बाबा त्याला ओळखत होते. एकदा अमिरुद्दीनच्या स्वप्नात बाबा गेले व त्यांनी सांगितले तुझ्याकडे जो अबदुल नावाचा पोऱ्या आहे त्याला शिर्डीला माझी स्वतःची सेवा करायला पाठवून दे त्यानुसार अब्दुलची शिरडीला रवानगी करण्यात आली. १८८९ साली तो शिरडीस आला व मशिदीत बाबांच्या समोर येऊन उभा राहिला. तेव्हा बाबा त्यास म्हणाले, " क्यों बे कव्वा, तू आया ! " (कायरे कावळ्या तू आलास ?) त्यावेळी अब्दुलची उमर वीस वर्षांची होती. तेलाच्या पणत्या जागोजागी लावण्याचे, निंबाच्या झाडाखाली पणती खास करून लावण्याचे तसेच मशिद दररोज झाडून साफ करण्याचे, निंब वृक्षाच्या खालची जागा स्वच्छ करण्याचे बाबांचे कपडे धुण्याचे काम हेच अब्दुल करीत. बाबांनी त्याला कुराण शिकविले. इतर धार्मिक शिक्षणाची पण शिकवण दिली. बाबांनी त्याला सांगितले होते सदाचाराने वाग. आपले जीवन शुद्ध ठेवण्याचा यत्न कर. आवश्यक तेवढेच जिवंत रहाण्यापुरते खा व जरुरीपुरतीच झोप घे, आणि जर का तू असे वागलास तरच तू मुक्त होशील. बाबांचा लाख मोलाचा उपदेश त्याने पाळला. बाबांच्या अखेरीपर्यंत त्याने नावांची मनोभावे सेवा केली. ते १९५४ साली पैगंबरवासी झाले. त्यांनी मटण खाल्ले नाही. श्रावणातले उपास ते करीत. त्यांनी आपल्या बायको-मुलांनाही कधीच शिर्डीला आणले नाही. पण का कुणास ठाऊक त्यांना अंतःकाळी खूप यातना सहन कराव्या लागल्या. चावडी इमारतीसमोर असलेली झोपडी ही अब्दुल



लेंडी बागेतील नंदादीप

बाबांची झोपडी म्हणून दाखविण्यात येते पण ती खरी राधाकृष्णमाईची झोपडी. त्या येथे राहात होत्या. बाबांच्या निर्वाणानंतर समाधीची सेवा करण्याचे काम अब्दुला-कडे सोपविण्यात आले होते, व जवळच त्यांच्या रहाण्याची सोय करण्यात आली होती पण कुठे तरी काही तरी बिनसले व अब्दुलास मंदिर सोडून या जागेत येऊन रहावे लागले. या जागेसाठी सरकारी मंजुरी पण घ्यावी लागलेली आहे. सध्या या झोपडीत अब्दुलबाबांचा मुलगा अब्दुल पठाण व नातू रहातात. बाबांच्या पादुका व अब्दुलबाबांचे फोटो–तसबिरी व काही वस्तू तिथे दर्शनीय भागात ठेवण्यात आल्या आहेत.

४) चौथी समाधी जी आहे ती तात्या पाटील कोते यांची. बाबांचे हे एक परमभक्त होते. बाबा दरदिवशी त्यांना खर्चासाठी दररोज चार रुपये देत असत. आपल्या अंतीम दिनीसुद्धा ( १५–१०–१९१८ ) बाबांनी तात्याला चार रुपये दिले. १९४५ साली तात्या समाधीस्थ झाले त्यांची ही समाधी.

प्रत्यक्ष लेंडीबागेचे प्रवेशद्वार वेलीनी आच्छादलेले असे कमानी प्रवेशद्वार आहे. लेंडीबागेचे तीन भाग पडतात. एका भागात नानारंगाचे गुलाब, निशिगंध, तुळस, सब्जा, मोगरा, इत्यादी फुलांची रोपटी, अशोक, सुरू गुलमोहोर, नारळ इत्यादी झाडे आहेत. त्याचबरोबर सशांचेसाठी ससेगृह, मोर, कबुतरे, हरणे व सांबर इ. पशुपक्षी बाळगण्यात आले असून त्यांच्यासाठी नैसर्गिक दिसतील अशी साजेशी घरे पण बांधण्यात आली आहेत. या बागेतील फुले व तुळशी सकाळीच बाबांना वाहण्यासाठी म्हणून आणली जातात. या बागेच्या भागाचा विकास साधण्यासाठी पेंबूरचे दानशूर उद्योगपती श्री. डी. आर. उर्फ मामासाहेब मराठे यांनी सर्वतोपरीने सहाय्य केले आहे.

लेंडीबागेच्या दुसऱ्या मधल्या भागात प्रवाशांना भक्तांना बसता यावे, विश्रांती घेता यावी म्हणून एकूण २५ सिमेंट कॉंक्रीटची बाके अंतरा-अंतराने ठेवलेली आहेत. या भागात असलेल्या पिंपळाच्या झाडाखाली ह्यातीत बाबा येथे येऊन बसत. हा पिंपळ बाबांनी स्वहस्ते लावला. पिंपळाची एक शुष्क फांदी बाबांनी येथे रोवली. तिलाच पालवी फुटून सध्याचा हा अश्वत्थवृक्ष बहरलेला आहे. या पिंप-ळाच्या बुंध्याला नऊ धारा आहेत म्हणून त्यास ' नवग्रह पिंपळ ' असे म्हणतात. मुंबईस गोरेगाव येथे पाटकर कॉलेजच्या जवळच आश्रम बांधून रहाणाऱ्या कमू-बाबांनी हे रहस्य प्रगट केले असे सांगतात. कमूबाबा हे बाबांचे भक्त होते. त्यांनी बाबांचे दर्शन घेतले होते. काही वर्षांपूर्वी ते स्वर्गवासी झाले.

पिंपळाच्या झाडाजवळच निंबवृक्ष पण आहे. या पिंपळ व निंबवृक्षाच्या बुंध्याशी बाबा लेंडीबागेत आले की नित्य बसत म्हणूनच की काय त्या जागेची स्मृती म्हणून तिथे एक सुंदरसे दीपगृह बांधलेले आहे. हे दीपगृह अष्टकोनी संगमरवरी दगडावर असून संगमरवरानेच आच्छादलेले आहे. आत या स्तंभावर काचा लावलेल्या असून या काचपेटीत जुन्या पद्धतीचा दगडी दिवा लावलेला असून तो सतत तेवत असतो. या दिव्याला नंदादीप असे म्हणतात. या दिव्याच्या मागे बाबा लेंडीबागेस मिरवणूकीने निघालेले आहेत या प्रसंगाची एक तसबिर ठेवण्यात आलेली आहे.

नंदादीपाच्या अगदी समोर सुमारे २५–३० पावलावर असलेल्या एका औदुंबर वृक्षाखाली भगवान श्री दत्तात्रेयाचे एक सुंदर संगमरवरी मंदिर आहे. तीन शिरे सहा हात अशा थाटाची ही मूर्ती मनोहर असून मूर्तीच्या उजव्या हातास तिरप्या




श्रीबाबांचा लाडका शामसुंदर घोडा

कोनात संगमरवराचीच गाय व डाव्या हातास श्वान मूर्ती आहे. मूर्तीच्या दोहो बाजूस काचेच्या उभ्या चौकोनी कपाटात नंदादीप तेवत असलेले दिसतात. जवळच एक दक्षिणापेटी पण ठेवण्यात आलेली आहे. लेंडीबागेतील ही दत्तमूर्ती ६-१२-१९७६ रोजी दुपारी ११–०५ ला प्रतिष्ठापीत करण्यात आली होती. या प्रसंगी साकोरी कन्या कुमारी उपासनी मठातील मुख्य आचार्य वेदशास्त्र संपन्न श्री. वसंतशास्त्री देशमुख यांनी वेदमंत्र घोषात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. दत्त मंदिराच्या मागील बाजूस जमिनीलगत एक देवळी आहे तीमधे पण एक बैठी दत्तमूर्ती व तिच्याच शेजारी बाबांची एक छोटीशी तसबिर ठेवण्यात आली आहे. हे मंदिर बाबांच्या कालापासूनचे आहे. या देवळीजवळच एक समाधीस्थान आहे, ते म्हणजे बाबांच्या लाडक्या शामसुंदर घोड्याचे. हा अश्व बाबांचा अतिशय लाडका होता व खुद्द तो अश्व बाबांना पण फारच भजत असे. आरतीच्या नंतर तो दोन पाय जमिनीला टेकून बाबांना नमस्कार करीत असे. बाबांच्या देहावसानंतर तो समाधीस्थानालाही नमस्कार करीत असे. १९४५ साली हा घोडा मरण पावला. त्यास लेंडीबागेतील या जागी समाधी देण्यात आली आहे.

लेंडीबागेच्या या दुसऱ्या भागात अगदी पश्चिमेकडे एक विहीर आहे. ती बाबांनी भक्तांच्या सहाय्याने खोदली. त्या विहिरीला बाबा 'जुदखी' असे म्हणत. बाबा या विहिरीचे पाणी पिण्यास वापरीत असत. या विहिरीला अलिकडे पुन्हा थोडे पाणी लागले आहे. या विहिरीला लागूनच एक छोटी इमारत आहे. तीवर "स्वयंपाकाकरिता जागा" अशी पाटी लावलेली आहे. पण दुरुपयोग होऊ नये म्हणून ही जागा तूर्त बंद करूनच ठेवलेली आहे. लेंडीबागेत कुणालाही विटा रचून चुली मांडून स्वयंपाक करता येतो.

लेंडीबागेत दत्तमंदिराच्या पाठीमागे काही अंतरावर सरपण लाकूडफाट्याचाही साठा करून ठेवण्यात आला आहे व जवळच एक चौकोनी विहिर आहे. तीवर पंप बसविण्यात आले असून ते पाणी सर्व कामासाठी वापरले जाते. ही विहिर अलीकडच्या काळात खोदण्यात आलेली आहे.

लेंडीबागेच्या तिसऱ्या भागात पश्चिम–उत्तर कोपऱ्यात 'साईनिवास' नावाचे अतिथीगृह असून तिथे आधुनिक पद्धतीने सुसज्ज असे ९ ब्लॉक्स आहेत. प्रत्येक ब्लॉकचे दरदिवशीचे भाडे २० रु. आहे. या इमारतीचे उद्घाटन २४-३-१९७३ रोजी गणेशपुरीचे श्रीगुरुदेव आश्रमाचे स्वामी मुक्तानंद परमहंस यांचे शुभहस्ते करण्यात आले. या अतिथी गृहासमोर मोटारी उभ्या करण्याची जागा–कारपार्क आहे. या भागात सिमेंट कॉंक्रीटची सहा बाके आहेत. या साईनिवास इमारतीच्या पाठीमागे सुंदर हिरवळीची जागा असून संस्थानतर्फे आयोजित लहान मोठे कार्यक्रम तिथे

आयोजित केले जातात. या इमारतीच्या जवळच असलेल्या प्रवेशद्वारातून बागेत थेट रस्त्यावरून आत येता येते. या लेंडीबागेची व्यवस्था पहाण्याचे काम संस्थान इंजिनियर श्री. दा. चिं. पाटील यांचेकडे आहे. या लेंडीबागेत भक्तांना मनःशांती मिळते. अशी आहे ही श्री साईबाबांची लेंडीबाग आणि अशी आहे तेथली ही माहिती.

★


॥ अकराव्या अवताराचे आगमन ॥



संत चूडामणी
भगवान
॥श्री साईबाबा॥
(ले. सदानंद चेंदवणकर)

रविमुकुल

सर्वधर्मीयांचे आराध्य दैवत
श्री साईबाबा
यांच्या जीवनकार्याचा आणि चमत्कारांचा संपूर्ण सचित्र परिचय करुन देणारा व साईभक्तांना संग्राह्य असा प्रासादिक ग्रंथ

२७ जुलै '८१
पासून सर्वत्र उपलब्ध

★ आकर्षक तिरंगी मुखपृष्ठ
★ पृष्ठ सुमारे २७५
★ पांढरा शुभ्र कागद
★ सुबक छपाई

● मूळ किंमत रु.३०
● सवलतीत रु.२०
सवलत दि. १ सप्टें.'८१ पर्यंत.

अंजली पब्लिशिंग हाऊस पुणे ३०
१५११ सदाशिव, पेंडसे चाळ,
पुणे-४११ ०३०

अनर्थाच अर्थ सांडी आता । विटेवरी नीट आनंदाचा कंद । तुका म्हणे छंद नामघोषे ॥

अनेक जन्मातील संचितामुळे—सुकृत्यामुळे आपणाला नर जन्म प्राप्त झाला आहे. म्हणूनच आपण आपला उद्धार करून घेतला पाहिजे. आपणच आपला शत्रु असतो व आपणच आपला मित्र बनतो.

उद्धरेदात्मना त्मानं नात्मानमवसादयेत ।
आत्मेव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

एखाद्या तरुण माणसाला देवाचे नाव घेऊन देह सार्थकी लाव असे सांगितले तर तो म्हणतो आम्ही तुमच्यासारखे जखड ८६ वर्षांचे म्हातारे झालो नाही. अजून आम्हाला पुष्कळ वर्षे कंठायची आहेत. त्याला लगेच तुकाराम महाराज उत्तर देतात.

काळ जवळिया उभा नेणा । घाली झांपडी खुंटी काना ॥
ज्ञानदेव माऊली म्हणते—
हे काळानळाच्या तोंडी । घातली लोणीयाची उंडी ॥
माशी पाख पाखडी तंव हे सारे ॥

या सगळ्यांचा मतितार्थ एवढाच की, तुला जे काही साधायचे आहे ते आजचे आज साधून घे. साधकाला अंतीम साध्य म्हणजे ईश्वर प्राप्ती ती साधायला साधना करावी लागते. मुमुक्षाला साधक-साधना-साध्य या त्रिपूटीची कास धरावी लागते.

ईश्वराजवळ पोहचायला साधकाला अध्यात्मिक तयारी ठेवावी लागते. ती तयारी ठेवायला श्रीसमर्थांनी साधकाची काही लक्षणे सांगितली आहेत.

देहे बुद्धि विवेके वारी । आत्मबुद्धि सुदृढ धरी ।
श्रवण मनन केलेची करी । या नाव साधक ॥ १ ॥
तोडोनि द्वैताची उपाधी । नद्वैते वस्तु साधने साधी ।
लावी एकयेतेची समाधी । या नांव साधक ॥ २ ॥
सावध दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्य विवेक ।
संग त्यागूनि एक । सत्संग धरी ॥ ३ ॥

वरील लक्षणानी युक्त साधक असला म्हणजे तो साधना करायला लायक ठरतो. साधना करायला साधकाजवळ तीन गुण असावे लागतात. तो श्रद्धावान पाहिजे. त्याला चिकाटी पाहिजे आणि तो आज्ञाधारक पाहिजे. ' धीर आणि सबुरी

# साधक–साधना–साध्य

—डॉ. राजाराम सिताराम कापडी
एम्. बी. बी. एस.
राजारामपुरी, कोल्हापूर

● परमेश्वराने या अवनीवर चौऱ्यांशी लक्ष योनी निर्माण केल्या, असे हिंदु धर्मग्रंथात सांगितले आहे. त्यात अनेक जन्मांच्या पूर्व पुण्याईमुळे मानवप्राण्याला मनुष्य देह प्राप्त झाला. नर करणी करे तो नारायण बन जाये. एवढे सामर्थ्य दयाघन प्रभूने मानवाच्या बुद्धिमत्तेत साठवले आहे. अशा तऱ्हेचे सामर्थ्य इतर कोणत्याही योनीतील प्राण्याला मिळालेले नाही.

मानव आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर तप सामर्थ्याने ईश्वर सदृष्य कामे करतो. विज्ञानशास्त्रात पारंगत होऊन त्याने कितीही अद्‌भूत–अचाट कामे केली, पंचमहा भूतावर वर्चस्व गाजविले तरी परमेश्वराने अंतीम गुरुकिल्ली आपल्या हाती ठेविली आहे.

मानवाने ट्यूब बेबीसारखा जीव तयार केला. पाहिजे त्या स्वभावधर्माचा जीनसची म्हणजे प्राणी निर्माण करणाऱ्या पेशींची उलटापालट करून मानव तयार करू शकतो. सात्विक देवतत्वाचे तसेच राक्षसी तत्वाचे प्राणी तयार करू शकतो. परंतु ट्यूबबेबी जीव तयार झाला तरी त्याची वाढ मातेच्या गर्भाशयात त्याचे रोपण झाल्याशिवाय होत नाही.

म्हणून मानवाने आपल्या बुद्धिमत्तेची घमेंड न मारता त्या विश्वचालकाला शरण गेलेच पाहिजे. मानव ज्या एकाग्रचित्ताने आपले सर्वस्व ओतून अदभूत चमत्कार करतो. अणूसारखे विश्वसंहारक शस्त्र तयार करतो. पण तेच शस्त्र भस्मासुरासारखे त्याच्यावरच कधी उलटेल ते सांगता येत नाही. त्या भयंकर शस्त्राच्या दडपणा खाली त्याला जन्मभर राहावे लागते. पण त्याच एकाग्रचित्ताने मानवाने ध्यान धारणा केली तर सायुज्यमुक्ति मिळते. त्याला ईश्वरप्राप्ती होईल. ' पुनरपी जननम पुनरपी मरण ' हे शुक्लकाष्ट पाठचे सुटेल.

मानवाचे अंतीम साध्य ईश्वर प्राप्ती हेच असायला पाहिजे. ते साध्य गाठायला खडतर साधना करावयाची असते. ही साधना गुरुच्या कृपेशिवाय सुसाध्य होत नाही. गुरुची कृपा व्हायला आपली अध्यात्मिक तयारी असली पाहिजे.

' बहुत जन्माअंती जन्मालाशी नरा ।
देव तो सोयरा करी आता । करी आता बापा स्वहितांचा सार्थ ॥

साईबाबा मात्र थांबले. अतिथी या नात्याने पुढे आलेले अन्नाचे ताट लाथ डून पुढे जाणे शहाणपणाचे नाही. बाबांनी चटणी भाकर खाल्ली. पाणी प्याले, ढेव देऊन 'अन्नदाता सुखी भव' असा आशीर्वाद देऊन ते पुढे सटकले. इतक्या त्यांना गुरु भेटले. ते म्हणाले 'चल माझ्याबरोबर तुझा ईप्सीत मार्ग दाखवितो एका विहीरीच्या काठी आले. आपल्या कमरेची दोरी त्यांच्या पायाला बांधून बाबाल अलगत उलटे विहीरीत सोडले. पाण्याला हात पोहोचतील इतक्या अंतरावर त्यां टोक पोहचल्यावर दोरीची दुसरी गाठ विहीरीवर लोंबकळत असलेल्या झाडा बांधली व गुरु निघून गेले. दहाबारा घडीनी परत आल्यावर भरभर साईबाबाल त्यांनी वर काढले व विचारले 'बरा आहे ना ?' बाबांनी उत्तर दिले 'आनंदाच्य सागरात डुंबत होतो ?' बाबांनी त्यांचे पाय धरले. गुरुने मस्तकावर हात ठेवून अनु ग्रह (शक्तिपात) केला. साधकापैकी फक्त बाबाची एकट्याची आध्यात्मिक तया झालेली होती. म्हणून तुकाराम महाराजांसारखे बाबांना गुरु भेटले. तुकाराम मह राज गंगेवरून स्नान करून येत असता चैतन्य बाबांची गाठ पडली. दृष्टाद होताच तुकाराम महाराजाना अनुग्रह झाला. स्वप्नातून जागे तर आपण झालो ना असे तुकाराम महाराजाना वाटले. झोपेत तुकाराम महाराजांना बाबा चैतन्य गु भेटले हे म्हणणे चूक आहे. साईबाबासुद्धा साधकाची परीक्षा पाहिल्याशिवाय अनु ग्रह करीत नव्हते. साधक बाबांच्या कसाच्या परीक्षेला उतरला तरच ते त्याल आपला म्हणत.

एकदा गुरुची धरल्या कास । पायी ठेवल्या पूर्ण विश्वास । मग शिष्याची चिंत तयास । नलगे सायास करावया ॥

एकदा हरी सि. दिक्षीत ज्याला बाबा काका म्हणत त्या साधकाची परीक्ष कसास लागण्याची वेळ आली. बाबाच्या दरबारात एकाने आसन्नमरण बोक आणला. बाबाच्या शेजारी बडेबाबा म्हणून एक मुसलमान भक्त बसले होते. त्याच्य कडे वळून बाबा म्हणाले बडेबाबा उठा. एका घावात याचे निर्दालन करा. बडे बाबाने तोंड वेंगाडले 'कैसा बे इसकू काटना खाली' बाबांचे दुसरे एक साधक भक्त माधवराव देशपांडे जवळच होते. त्याला बाबा म्हणाले 'शामा जा सुरा आ आणि या बोकडाला मुक्ती दे' माधवराव म्हणजे बाबांचे कल्याण. ते सुरा आणा वयास गेले. त्यांनी एक लहानशी सुरी आणली. बाबा म्हणाले अरे याने भाज तरी कापता येईल का ? जा चांगला मोठा सुरा घेऊन ये. माधवराव जे गेले त लवकर परत आले नाही. बाबांनी हरीकाका दिक्षीताला सांगितले. 'काका जा त तरी मोठा सुरा आणून या बोकडाला ईश्वर स्वरूपी लीन कर.

। साईबाबांचा दोन अक्षरी मंत्र आत्मसात केला पाहिजे. साधकाने खडतर तपश्चर्या ख्री पाहिजे. गुरुच्या कृपेशिवाय साधना सुसाध्य होत नाही. साधना कशी करावी : भगवंतांनी भगवत गीतेत खालीलप्रमाणे सांगितले आहे.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ अ–४–३४

भावार्थ : तत्ववेत्ते ज्ञानी, गुरुला साधकाने प्रणिपात केल्याने, नम्रतापूर्वक प्रश्न केल्याने, गुरुची सेवा केल्याने प्रसन्न होऊन त्याला ( साधकाला ) ज्ञानाचा उपदेश करतात.

परमपूज्य साईबाबांनी वरील श्लोकाचा पारंपरीक अर्थ मान्य करूनही या श्लोकावर भाष्य केले आहे. 'ज्ञान हा उपदेश करण्याचा विषय नाही. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ते स्वयंसिद्ध आहे.' याला आधार ज्ञानदेव माऊलीच्या खालील ओवीत सापडतो.

" मोटके गुरुमुखे उदैजत दिसे । हृदयी स्वयंमचि असे ।
प्रत्यक्ष फावो लागे तैसे । आपैसयाचि ॥ "

गंजलेले सोने भट्टीत टाकून त्यावर आलेला कीट नाहीसा केला म्हणजे लखलखीत सोने दृष्टीस पडते किंवा पाण्यावर आलेली शेवाळ हाताने बाजूला केली म्हणजे निर्मळ स्वच्छ पाणी दिसते. तसे ज्ञानावर मायेने घातलेले आवरण गुरुच्या उपदेशाने नाहीसे झाले म्हणजे स्वयंसिद्ध ज्ञान अगोदर होते. अर्थात साधकाला त्याकरता खडतर तपःश्चर्या करावीच लागते.

साधक दशेत श्री सद्गुरु साईबाबांनी खडतर तपश्चर्या कशी केली हे स्वतःच्या आचरणाने खाली दाखवून दिले आहे.

गुरुच्या शोधासाठी बरोबर आणखी दोन तीन विद्वान साधक घेऊन साईबाबा एका घनदाट अरण्यात फिरत असताना, त्यांना एक वणजारी भेटला. तो म्हणाला 'दोन प्रहरच्या रखरखत्या उन्हात घनदाट अरण्यात वाट दाखवायला एखादा वाटाड्या घेतल्याशिवाय जाऊ नका. चक्रव्यूहात सापडल्यासारखे होईल. निदान माझ्या झोंपडीतील चतकोर भाकर तरी खावून अरण्यात शिरा. पण त्या साधकांनी तिकडे लक्ष दिले नाही. ते निमूट अरण्यात शिरले. फिरफिरून ते शेवटी त्याच ठिकाणी परत आले. पुनः वणजारी भेटला. काकूळतीने तो म्हणाला 'थकला आहात, आतातरी भाकर खावून जिकडे जायचे तिकडे जा.' बाबाशिवाय इतरांनी त्याला धुडकावलेच.

मोठ्या कष्टाने होते म्हणून कर्मयोग आचरण्याचा अभ्यास कर अभ्यास म्हणजे नियमित वारंवार तेच कर्म करण्याची संवय ठेव. अभ्यास जमत नसेल तर सर्व क माझ्या ठिकाणी अर्पण कर. ते सुद्धा साध्य होत नसेल तर अथैतदप्यसक्तोसि कर्तुम योगमाश्रितः ।

सर्व कर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान ॥ अ. १२/११
सर्व कर्माच्या फळाचा त्याग कर. ज्ञानदेव माउली म्हणते—

पुनवेहूनि जैसे । शशिबिंब दिसे दिसे । हारपत अंवसे । नाही सी होय
तैसे भोग आंतूनि निघता । चित्त मनमाजी रिगता । हळू हळू पंडुसुता
मीचि होईल. ॥

भावार्थ : चंद्रबिंब पौर्णिमेनंतर दिवसे दिवस कमी होत अमवास्येला नाही होते. तसे विषयापासून निवृत्त होऊन माझ्या ठिकाणी जडणारे चित्त हळूहळू मद रूपच होईल. म्हणून भगवंतानी गीतेत प्रथम कर्मयोग सांगितला. नंतर ज्ञानयोग व शेवटी भक्तियोगाचे विवरण केले. भक्ति योगात क्रियायोग मोडतो. साईबाबांना शास्त्र अवगत होते. तीन दिवस बाबांनी लावलेली समाधी ही क्रिया योगाचाच प्रका आहे. अलिकडे काही साधू पाच पाच सात सात दिवस सात आठ फूट खड्ड खणवून त्यात योग समाधी घेतात व ठराविक वेळी खड्ड्याच्या बाहेर येतात अर आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे.

बंगालकडील साधुनी तर अलिकडे क्रियायोगात प्रगती करून सायुज्यमुक्तीच सोपा करून दाखविला आहे. योगानंद नावाच्या संताने 'ऑटोबयोग्रफी ऑफ ए योगी' या आत्मचरित्रपर ग्रंथात बंगालकडील संतांचे अद्‌भूत चमत्कार वर्ण आहेत. पुढे कधीतरी वाचकांची जिज्ञासा पुरी करता येईल.

हरीकाका दिक्षीतानी मोठा सुरा आणला. बाबांच्या पुढे ठेवला. बाबा म्हणाले पहातोस काय ? उचल सुरा आणि दे याला मुक्ती. काका बाबांचे परम भक्त. बाबा कशी सोने । गुरुचे वचन हेच मोक्षाचे साधन । असे मानणारे त्यांनी काकू न करता सुरा उचलला कास कसली आणि म्हणाले बाबा, द्या शेवटची आज्ञा । हे पहातोस काय ? घाल घाव. । काका बोकडाच्या मानेवर सुरा मारणार अशी बाबांची खात्री झाल्यावर बाबा म्हणाले थांब । राहू दे आज, काका । अरे तू ब्राम्हण, उच्च जातीत जन्मून अशी हिंसा करतोस । असा निष्ठूर कसा झालास ? बोकडाचे मरण तुझ्या हातून नाही. उचला त्याला आणि पलिकडच्या फकीरांच्या बसण्याच्या कट्यावर ठेवा. कट्यावर ठेवण्याआधीच उचलल्याबरोबर बोकड गतप्राण झाला. बोकड भाग्यवान होता. शेवटच्या संताच्या दर्शनाने तो पावन व्हायचा होता आणि इतरांच्या दृष्टीने हरीकाका श्रेष्ठ भक्त–साधक ठरायचा होता. म्हणून बाबांनी हा प्रसंग घडवून आणला.

साधनेच्या कसोटीला साधक उतरला म्हणजे त्याला अंतीम साध्य जी सायुज्यमुक्ती ती मिळविण्यासाठी झगडावे लागते.

परविद्येच्या किंवा परमधर्माच्या क्षेत्रात ईश्वरप्राप्तीसाठी अनेक मार्ग सांगितले आहेत. त्यापैकी ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग हे तीन महत्वाचे मार्ग आहेत.

पूर्वी, त्रेता किंवा द्वापार युगात जप तप, यज्ञयाग, अखंड तपश्चर्या करून ईश्वरप्राप्ती मिळविण्यास ऋषीमुनी जनकादिक राजे यशस्वी झाले. पण कलीयुगात ज्ञानदेव, तुकारामादि संतानी भक्तियोग आचरुन मुक्तीचा मार्ग सुलभ करून दाखविला. कलीयुगात आध्यात्म साधायला दोन धर्माचे महत्व सांगितले आहे. साईबाबा साधकाकडून–भक्ताकडून दक्षिणा घेत असत. यातील मर्म तेच आहे. एवढेच नाही तर दानधर्म करायला साईबाबा कृतीने दाखवित असत. हंडीत निरनिराळ्यावेळी निरनिराळे मिष्टान्न स्वतः शिजवून ते भक्ताना वाटीत असत. यातील हेतूही तोच आहे.

भक्ती योगात सगुण व निर्गुण मार्गाचा समावेश होतो. यातील निर्गुण भक्तीचा मार्ग जरा कष्टकारक आहे. प्रत्यक्ष भगवंत गीतेत म्हणतात.

> क्लेशोऽधिकतर स्तेषामव्यक्ता सक्त चेत साम् । अ. १२/५
> अव्यक्ताही गार्तिर्दुःख देहवभ्दिर वाप्यते ॥

**भावार्थ :** अव्यक्त ब्रम्हाच्या उपासनेत ज्याचे मन गढून गेलेले आहे त्यांना कष्ट अधिक पडतात. कारण देहवान मानवी प्राण्यांना अव्यक्त ब्रम्हाची प्राप्ती

# तरी मी धावेन भक्तांसाठी

—प्रो. एच. बी. महाले, एम. एस. सी.
अध्यक्ष गणित विभाग,
ज. ह. शासकीय महाविद्यालय बैतूल. म. प्र.

● १९६३ साली मी शासकीय महाविद्यालय, दतिया, मध्यप्रदेशमध्ये व्याख्याता म्हणून अध्यापनाचे कार्य करीत होतो. त्याचवेळी सौ. कान्ता अय्यर ह्या शिक्षिका म्हणून मुलींच्या उच्चतर माध्यमिक विद्यालय, दतियामध्ये कार्य करीत होत्या. यांच्या नवऱ्यांची ग्वालियरला सहायक प्राध्यापकांच्या जागेवर शासकीय महाविद्यालयात बदली झाल्यामुळे सौ. अय्यर आमच्याकडेच राहू लागल्या. त्या शिरडीच्या बाबांच्या भक्त. मी व माझी बायको यांना साईबाबांचे नुसते नावच माहित होते. सौ. अय्यरांनी आमच्या घरात एका खोलीत श्री साईबाबांचा फोटो ठेवला व त्या सकाळी आणि संध्याकाळी रोज मन लावून प्रार्थना करीत. पुढे मे महिना लागताच सौ. अय्यर ह्या ग्वालियरला आपल्या पतीकडे निघून गेल्या. त्या गेल्यावर मला श्री साईबाबांचा फोटो त्याच जागेवर दिसला, जेथे सौ. अय्यर यांनी ठेवला होता. मी माझ्या बायकोला बोलाविले व तोच फोटो दाखविला आणि उपहास केला की बारे बाई ! आली मोठी साईबाबांची भक्त. येथे तर रोज दोन वेळा प्रार्थना करायची, आणि जाताना बाबांचा फोटो घेऊन जाण्याची आठवण पण राहिली नाही. ह्या गोष्टी मी व माझी बायको विसरलो. आणि ५–६ मे, १९६३ च्या दरम्यान मी आणि माझी बायको व मुले कळंबा महाली, जिल्हा अकोला : महाराष्ट्र येथे गेलो.

उन्हाळ्याची सुट्टी संपल्यावर आम्ही सर्व व सौ. अय्यर सर्वजण दतियाला जुलै, १९६३ मध्ये पोहोचलो व आपआपल्या नौकरीवर हजर झालो. तेव्हा मी व माझ्या बायकोनी सौ. अय्यर यांना पुन्हा उपहासानी म्हटले की बाई, साईबाबांचा फोटो नेण्याची तुम्हास आठवण तर राहिली नाही आणि येथे तर दिवसातून दोन-दोन वेळा प्रार्थना करायच्या. तेव्हा त्या दृढपणे म्हणाल्या, ' असे शक्यच नाही. मी बाबांचा फोटो माझ्याबरोबरच नेला होता व रोज येथल्या सारखीच ग्वालियरला सुद्धा प्रार्थना करावयाची आणि आता येताना मी तोच फोटो बरोबर आणला आहे आणि त्याच जागेवर पुन्हा ठेवला आहे. '

हे सर्व ऐकून आम्हा दोघांना आश्चर्याचा धक्काच बसला. व आम्हास बाबा हे देव एकाच वेळी फोटोच्या रूपाने दोन ठिकाणी उपस्थित राहू शकतात, याचा

अनुभव आला. मला असे वाटते की आम्हाला दर्शन देण्यासाठीच बाबा फोटो रूपानी दोन्ही ठिकाणी हजर राहिले.

तसेच ह्यावेळी आम्हास सौ. अय्यर यांनी सांगितले की बाबा जागृत दैवत आहेत व त्यामुळे मी आणि माझी बायको साईबाबाकडे आकर्षिले गेलो.

पुढे एखाद्या वर्षानंतर मी ह्याच अय्यर परिवाराबरोबर शिरडीस गेलो. माझी ही पहिलीच वेळ शिरडीला जाण्याची. अय्यर परिवारांनी बाबांचा अभिषेक केला. मी त्यांच्या जवळ नव्या व्यक्तिप्रमाणे बसून होतो. अभिषेक संपल्यावर मी पाहिले की ज्यांनी अभिषेक केला आहे. त्यांना बाबांच्या मूर्तीचे दर्शन घेताना पुजारी बाबांच्या गळ्यातील फुलांचा हार देत आहे. अय्यर परिवारांना सुद्धा पुजाऱ्यानी हार दिला. ह्या वेळी माझ्या मनात विचार आला की आपण जर अभिषेक केला असता तर आपल्याला सुद्धा एक हार मिळाला असता. पण आता काय उपयोग. वेळ निघून गेली आहे. श्री. अय्यरांनी हार घेतला व ते मागे वळले व मीही त्याच-प्रमाणे मागे वळलो. तावडतोब पुजाऱ्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला. त्यामुळे मी मागे पाहताच मला पुजाऱ्यांनी थांबण्याची खूण केली. मी थांबलो व मलासुद्धा पुजाऱ्यानी बाबांच्या गळ्यातील एक मोठा हार दिला. 'जाणा येथे आहे सहाय्य सर्वास। मागे जे जे ज्यास ते ते लाभे।' माझ्या आनंदाला पाराबार राहिला नाही. बाबा कसे अंतर्यामी आहेत, ह्याचा मला अनुभव आला व मी बाबांकडे अधिकाधिक ओढला जावू लागलो आणि आज त्यांना जगदाधार परमेश्वराचा अवतार मानतो आणि ह्याच साईबाबांनी आता पुट्टपार्थीला श्री सत्य साईबाबा म्हणून, समाधि घेताना घोषणा केल्याप्रमाणे, अवतार घेतला आहे. जुलै, १९७८ मध्ये मी पुट्टपार्थीला बाबांचे दर्शनासाठी शिरडीवरून दर्शन घेऊन गेलो. ह्याचे कारण हे की श्री सत्य साईबाबा नेहमी म्हणतात की माझ्या दर्शनाला येण्यापूर्वी तुम्ही माझ्या पहिल्या ठिकाणी–शिरडीला आधी दर्शन घ्या आणि मग पुट्टपार्थीला या.

जुलै, १९७९ मध्ये मला चुकीचे इंजेक्शन उजव्या हाताला लागल्यामुळे भोपाळ मेडिकल कॉलेजमध्ये भरती व्हावे लागले. प्रतिक्रिया भयंकर होती. जीवन मृत्यूचा प्रश्न होता. मी श्री सत्य साई बाबांना प्रार्थना केली की देवा आता तूच या संकटातून मला वाचव. श्री सत्य साईबाबांनी आगष्ट १९७९ मध्ये मला याच हॉस्पिटलमध्ये स्वप्नात दर्शन दिले. त्यांनी माझ्या उजव्या हाताला, कोहिनी आणि मनगट ह्यामध्ये त्यांच्या एका बोटाने स्पर्श केला. माझे स्वप्न तावडतोब तुटले व मी बाबांना पाहतो तर बाबा तेथे नव्हते. नंतर मला माहित पडले की देवाचे स्वप्नात झालेले दर्शन प्रत्यक्ष दर्शनाच्या तुल्य असते. बाबांनी ज्या ठिकाणी माझ्या हाताला

स्पर्श केला होता, त्यांच्यावर गँगरीन वाढली नाही व तेथूनच डॉक्टरांना हात कापावा लागला. 'जरी हे शरीर गेलो मी टाकून, तरी मी धावेन भक्तांसाठी.' ऑपरेशन सफल झाले, हा बाबांचाच आशिर्वाद होता. जर बाबा माझ्या मदतीला आले नसते तर आज हा लेख मी लिहिण्याचा प्रश्नच नव्हता। जय साई राम।

# लीलामय श्रीसाईकृष्ण

—श्री. चकोर आजगावकर, एम. ए.
वाय् ११/१७० गव्हर्नमेंट क्वार्टर्स
वांद्रे ( पूर्व ) मुं. ४०००५१

● श्रीसाईबाबांच्या जीवनाचा आणि विभूतिमत्वाचा स्वरूपाकार श्रीकृष्णाच्या लीलामयतेशी पुष्कळसा मिळता जुळता आहे. बाबांचे व्यक्तित्व, जीवन व विभूतिमत्व दोन पदरी आहे. आतून उच्च साधकांसाठी बाबा शक्तिरूप, शिवरूप श्रीदत्तगुरू आहेत. तर आर्त, अर्थार्थी आणि तापत्रयाने मळलेल्या जीवांसाठी ते श्रीकृष्णरूप लीलानाटकी आहेत. हा लीलामय प्रभू शिर्डीच्या गोकुळात आपल्या बालगोपाळा-सह खेळला आहे, वागडला आहे. त्याने तेथे आपल्या अद्‌भुत चरित्र लीलांनी सर्वांची मने जिंकली, जीवदशा उद्धारली आणि भावी जीवन सुगंधित केले. शिर्डीचा कण न् कण या लीलानी सौरभित झाला आहे.

● श्रीबाबा हे कृष्णरूप आहेत, ते आपल्या भावुक भक्तांसाठी! प्रेमळ सवं-गड्यासाठी. भक्तिप्रेममय गोपगड्यासाठी. म्हणूनच शिर्डीतील मशिदीला त्यांनी द्वारका बनविले, त्या द्वारकेतील ते द्वारकाधीश श्रीपती कृष्ण बनले. त्या शामल कमललोचन कृष्णाच्या स्वरूपात आपल्या कृष्णभक्त भक्तांना त्यांनी प्रत्यक्ष दर्शनही दिले आहे. शिरडीला त्यांनी द्वारावती मानले. "ही शिरडी द्वारावती द्वारका-हरीची। दिव्यपुरी कांचनमय श्यामसुंदराची" असे "श्रीसाईगीतायन" बाबांचे स्वरूप वर्णन करते. "शिरडी वैकुंठपुरी, साईप्रभू श्याम" असेही बाबांच्या लीलामय व्यक्तित्वाला म्हटले जाते. यामुळेच श्रीबाबांनी श्रीराधाकृष्णाच्या

मंदिरात गोपाळकृष्णाची लीलामूर्ती बसविण्याऐवजी स्वतःचा देहच त्या ठिकाणी विश्रांत केला असावा. तो मुरलीधर गोपाळकृष्ण स्वतः असल्याचे श्रीबाबांनी आपल्या प्रतिकात्म भाषेत जगाला जाहीर करून जणु सांगितले. बाबांची बोलण्याची तऱ्हा ही अशीच सांकेतिक, परोक्ष होती.

● श्रीसाईबाबांनी कृष्णाप्रमाणे प्रेममय लीला करून साऱ्या भक्तरूप बाल-गोपाळाना सुखविले, उद्धरले आणि कृतार्थही केले. त्यांच्या जीवनात एक समर्पित भक्त श्रेष्ठ श्रीराधाकृष्णआईलाही महत्त्वपूर्ण स्थान होते. या बाईनी आपल्या वैधव्यकालात श्रीसाईंना श्रीकृष्णरूप मानून त्यांच्या पासून दूर राहून त्यांची मूक सेवा केली. या सेवेतून तिने शिरडी संस्थानची जणू निर्मिती केली. शिरडीचे रस्ते झाडण्यापासून भक्तांची व्यवस्था पहाण्यापासून तो थेट शिर्डीच्या उत्सवांची तयारी करण्यापर्यंत सर्व त्यांनी निरपेक्षभावाने केले. शिरडी संस्थानला त्यांनी आकार आणला. नित्यपूजा, आरत्या, छत्रचामर इत्यादी वैभव शिरडीसंस्थानला लाभण्यामागे या राधिकेची निष्पाप प्रेमप्रेरणा होती. जणु ही यमुनामाई या साईकृष्णाच्या पदाला स्पर्श करण्या-साठी भूमितलावर अवतीर्ण झाली आणि तिने श्रीसाईंच्या पावलाजवळची रुक्ष मरु-भूमी पल्लवित, सुगंधित करून नव्या वनश्रीने रमणीय बनविली. "श्रीसाईगीतायन" च्या शब्दात समारोप करूया.

"द्वारकेत नटनागर
चक्रपाणि हा गिरिधर
येथ प्रभू चरणावर लाख हे प्रणाम!"

किंवा

मुरलीधर साई मुकुंद
मुरलीधर मंदिरी आले।
चैतन्य कुडीतून मुक्त
जणु विश्व राऊळी खेळे!

★

अशा ह्या भक्ताकरीता निर्मिलेल्या कामधेनूचे कार्य कसे चालते. त्या मागच्या अध्यात्मिक व मानसशास्त्रीय शास्त्र प्रणालीचा घेतलेला शोध व बोध श्री साई लिलेच्या वाचकांना निश्चित उद्बोधक वाटेल, यात संशय नाही.

परंतु उदीच्या कार्य प्रणालीचा शोध घेण्यापूर्वी तिचे निर्माते श्री साईबाबा हे कोण व त्यांनी उदी कशी निर्माण केली हे पहाणे जरूर आहे.

श्री साईबाबांना आपण भक्तीभावनेने अवतार असे म्हणत असलो तरी श्री साईबाबा एक अद्वितिय व अतुलनिय असे महान सत्पुरुष होते असे म्हणल्यास ते अधिक बरोबर होईल. परंतु संत भूलोकीचे ईश्वरच होत. अर्थात् श्री साईबाबा हे परमेश्वर खरेच, परंतु ते संत होते म्हणून ते परमेश्वर आहेत. असे म्हटले की ती भावना न ठरता शास्त्रीय ठरेल.

म्हणून बाबा महान संत होते. असे म्हटल्यानंतर संताचे स्वरुप काय ? असा प्रश्न निर्माण होतो.

**संतांचे स्वरूप :**

"या जगात देव कुणी पाहिला नाही व पाहू शकणार नाही. तर, त्याचे भजन केल्याने मनुष्यच देव होतो " असे गाडगेबाबांनी आपल्या किर्तनातून अनेकवेळा सांगितले आहे. भजन केल्याने चित्तशुद्धी होते व चित्तशुद्धीखेरीज मनुष्य ईश्वर दर्शनास पात्र ठरत नाही असे पुरातन भारतीय तत्वज्ञान आहे :

तेच सर्व संत वेगवेगळ्या शब्दात सांगतात. त्याच तत्वज्ञानाचे सार थोडक्यात सांगायचे झाले तर—

देव ही काही वेगळी वस्तू नसून मनुष्य हाच देव आहे, आणि मनुष्य म्हणजे त्याचे शारीरिक वा मानसिक अस्तित्व ( Physical or Mental ) नसून त्या ठिकाणी असणारा आत्मा ( Pure Consciousness ) हाच खरा परमेश्वर होय. किंवा रामदासांनी सांगितलेला राम तो हाच होय. हा एकदा का प्रसन्न झाला की, मनुष्यच परमेश्वर होतो. हेच बाबांनी " सबका मालिक एक " या शब्दात सांगितले आहे.

म्हणून परमेश्वर कसा होतो. त्याची प्रक्रिया काय हे पहाणे जरूरीचे आहे.

आपल्या मध्येच असणारा हा परमेश्वर केवळ स्वतःच्याच प्रयत्नाने मनाचे नियंत्रण करूनच जाणता येतो. असे हे मनाचे नियंत्रण कसे करावे व अंतीम ध्येय कसे गाठावे हे फक्त सद्गुरुच शिकवू शकतात. हे शास्त्र म्हणजेच अध्यात्म विद्या होय.

# बाबांची उदी : एक शास्त्रीय सत्य

—श्री. सुरेश सातपुते बी. कॉम.
जाम बिल्डिंग, लालबाग मुंबई १२

● श्री साईबाबांची उदी आज जगद्विख्यात आहे. उदी आणि साईबाबा हे समीकरण अगदी कसे जमून गेले आहे. उदी म्हटले की, बाबा आठवतात आणि बाबा म्हटले की, उदीचे स्मरण होते.

शंभर वर्षापूर्वी बाबांनी मंत्र बळाने अग्नी पेटवून धूनी निर्माण केली. अशा रीतीने धूनी निर्माण करण्यात बाबांचे अनेक उद्देश्य होते. त्यापैकी भक्तांची संकटातून मुक्तता करण्यासाठी उदी निर्माण करणे हा अत्यंत महत्वाचा उद्देश होता.

या धुनीमाईतून निघणाऱ्या अंगाऱ्याने आजमितीपर्यंत लक्षावधी भक्तांना आश्चर्याचा धक्का बसावा इतक्या चमत्कारीक रितीने संकट मुक्त केले आहे. तसेच अनेकांची अडलेली कार्ये यशस्वी झाली आहेत.

उदीने भक्तांची संकटातून मुक्तता होते. किंवा उदी जवळ ठेवल्याने अडलेले अवघड कार्यही यशस्वी होते. असा असंख्य साईभक्तांना जो अनुभव येतो. त्याचे कारण श्रीबाबांनी उदीत, निर्माण करून ठेवलेले आपले चैतन्यमय अस्तीत्व होय.

म्हणूनच कपाळी उदी लावली असता, पाण्यातून पोटात घेतली असता किंवा जवळ बाळगली असता, भक्त बाबांचे चैतन्य स्वरुपाच्या अगदी सान्निध येतो, आणि साक्षात परमेश्वर जोडीने उभा राहिल्याने कुठलेही कार्य यशस्वी झाल्याशिवाय कसे राहिल!

बाबा प्राथमिक काळात औषधी देत असत. परंतु नंतर नंतर त्यांचे कार्य केवळ उदीवरच चाले. कारण देहापेक्षाही आपले चैतन्य स्वरूप अधिक महत्वाचे आहे हेच बाबांना भक्तांचे मनावर ठसवायचे होते. कारण देहपातानंतर ही चैतन्यशक्ती आपले कार्य यावचंद्रदिवाकरौपर्यंत चालू ठेवणार आहे. ह्याची खात्री भक्तांना पटायला हवी होती. म्हणूनच बाबांनी उदी देण्यास सुरवात केली आणि बाबांच्या प्रत्यक्ष अस्तीत्वा इतकीच उदीही प्रभावी आहे. हे लोकांना पटत गेले... पटत आहे.

मनाचे महत्व जाणूनच रामदासानी मनाचे श्लोक लिहिले. यावरून अध्यात्म शास्त्रात मनाला किती प्राधान्य दिले आहे ते लक्षात येते. मन हेच सर्व सुखाचे. ( Pure Bliss ) साधन असून अनर्थाचे मूळ आहे. अर्थात अध्यात्मिक प्रगती-साठी त्यातील मानसशास्त्र जाणणे फार महत्वाचे ठरते.

मनाचे कार्य तीन स्तरावर चालते. १) बर्हिमन २) अंर्तमन ३) दैवीमन.

**बर्हिमन :** हे सर्वत्र अबाधितपणे भटकत असुन जगातील सर्व प्रकारच्या गोष्टी गोळा करून त्याची भरती करते व त्या गोष्टी बुद्धीकडे सोपविते.

**बुद्धी :** ( Intellect ) या गोष्टींची वर्गवारी करते व अयोग्य गोष्टी सोडून देते. व आवश्यक गोष्टी अंर्तमनाकडे पाठविते.

**अंर्तमन :** ( Sub-conscious ) अंर्तमन बरेच शक्तीशाली असून त्या अनेक आश्चर्यकारक गोष्टी घडवू शकते. त्याच्या सामर्थ्याचे चमत्कार वाचकांनी अन्यत्र वाचलेले असतीलच पण बुद्धीकडून आलेल्या गोष्टी पचवून ठेवून ( Digest ) योग्य वेळी बाहेर काढण्याचे कार्य अंर्तमन करीत असते.

**दैवी मन :** ( Pure Consciouness ) ही आपल्यामध्ये असणारी शुद्ध जाणीव होय. हेच अंतिम सत्य ( ultimate reality ) होय.

या जुजबी माहितीच्या आधारे, सामान्य माणसाचा संत कसा होतो ते पाहू.

प्रथमतः बर्हिमन मनाचे संयमन करून "मी कोण ?" असा प्रश्न विचारून साधना केली असता तो विचार अंर्तमनात पोहचतो. त्यामुळे त्याची शक्ती अनंत पटीने वाढते. त्यापुढे ही साधना केली असता अंर्तमनास त्याचे उत्तर सापडत नाही. अशा रितीने उत्तर सापडले नाही की ते शुद्ध जाणिवेस धडका देत बसते व धडका देता देता एके दिवशी ते शुद्ध जाणिवेतच विरघळून नाहीसे ( Merge ) होते. असे झाले की ज्ञानसमाधी लागते. अशा समाधीच्या वारंवार अभ्यासाने आत्मदर्शन होते व मनुष्य जीवनमुक्त होतो. त्याला आपले सत्य स्वरूप समजते व मी म्हणजे आत्मा आहे या भूमिकेवरून त्याचे कार्य सुरू होते.

यालाच स्वरूपी मिळणे असे म्हणतात. मी म्हणजे आत्मा आहे हे एकदा समजले की, तोच इतर प्राण्यामध्ये आहे हे समजते. तोच मी आहे व मीच तो आहे। इतकेच कशाला-त्रिखंड ब्रह्मांड व्यापून मीच मी सर्वत्र भरलेलो आहे याचे ज्ञान होते. यालाच पारमार्थिक परिभाषेत "अद्वैत स्थिती" (Non Dualstate)

असे म्हणतात. म्हणूनच या स्थितीतील महात्मे पालीचे–मुंगीचे मनोगत जाणतात. दूरच्या अंतरावरील घटना जाणतात किंवा स्वतःचे अस्तित्व दूर ठिकाणी किंवा एकाच वेळी अनेक ठिकाणी प्रकट करू शकतात.

ही स्थिती ज्ञानमार्गाच्या सहाव्या टप्प्यात घडते असे योगवाशिष्ठकार वाल्मिकऋषींनी लिहून ठेवले आहे.

अशा रितीने स्वरूपी मिळाल्यानंतर संतामध्ये भेद असा रहातच नाही. परंतु प्रत्येक संताच्या कालास व कार्यास अनुसरून त्याचे बाह्य वर्तन होत असते म्हणून श्रीसमर्थ म्हणतात–" संत दिसती वेगळाले। परि स्वरुपी मिळाले ॥ " (दासबोध)

या भूमिकेतून पहाताना साईबाबांनी जनता-जनार्दनाचे दुःखभार हलका करण्याचे फार मोठे ओझे स्वतःवर घेतलेले अगदी उघड दिसते. ह्याच त्यांच्या कार्यवाहीसाठी त्यांनी उदीची निर्मिती केली आहे हे उघड होते.

वाचकहो, बाबांच्या उदीत असे दुःखभार हलका करण्याचे सामर्थ्य आहे का? की केवळ आपली श्रद्धाच फलद्रूप होते? तर दोन्ही प्रश्नांची उत्तरे होकारार्थी द्यावी लागतील. अर्थात उदीची प्रचिती कशी येते व तिचे कार्य कसे चालते याचा शास्त्रानुरुप शोध घेतला तर,

बाबांची उदी + भक्तांची श्रद्धा = गुण ( प्रचिती–कार्यसिद्धी ) असे त्याचे समीकरण मांडावे लागेल. म्हणूनच या समीकरणाची छाननी केली तरच, बाबांच्या उदीचे कार्य कसे चालते हे लक्षात येईल.

**बाबांची उदी :**

अशा रितीने संताचे स्वरूप समजून आल्यानंतर बाबा आपल्या सत्य संकल्पाने उदीमध्ये आपल्या प्रभावी शक्तीचे कसे संक्रमण करीत ते पाहू या.

अंतर्मन अत्यंत शक्तीशाली असून, अंतर्मनाने केलेले संकल्प सत्य होतात. याचे वर्णन अनेक सुप्रसिद्ध लेखकांच्या ग्रंथातून दिलेले आहे. तेव्हा त्याची पुनरावृत्ती न करता अंतर्मन जर इतके शक्तीमान आहे असे सिद्ध होत असेल तर त्याच्याही पलीकडे असणारी शुद्ध जाणीव ( Pure Consciouness ) कितीतरी पटीने शक्तीमान असेल हे निःसंशय सिद्ध होते. म्हणून अंतर्मनास जर शक्तीमान म्हटले तर शुद्ध जाणिवेस " सर्वशक्तीमान " हेच विशेषण लावावे लागेल.

आता वरील सर्व द्योतक माहितीच्या आधारे मुख्य विषयाकडे वळू.

उदी निर्माण करण्यासाठी बाबांनी जी धूनी पेटविली होती. त्या धूनीवर बाबा रात्री अपरात्री बसून अग्नीत्राटक करीत असले पाहिजेत. कारण,

विटेचा त्या आधार घेऊनी । नित्य एकांत होता रजनी ।
बाबा मशिदीत स्वस्थ मनी । आसन लावून बैसत ॥

असा एक उल्लेख साईसच्चरितात आहे. यावरून किमान एक दिवसाआड तरी ( कारण एक दिवस आड ते चावडीत निजत ) रात्रौ सर्वत्र एकांत होताच बाबा अग्नीत्राटक करीत असले पाहिजेत. कारण नाथपंथातील केवळ महासिद्ध योगीच हे त्राटक करू शकतात. त्याच वेळी बाबांचा एकमेव असा संकल्प संक्रमित होत असला पाहिजे. तो म्हणजे–

"जो कोणी या धूनीतील उदीचा वापर करील त्याचे दुःख दूर झालेच पाहिजे" अर्थात अंर्तमनाने केलेला कुठलाही संकल्प सत्यच होतो असे शास्त्राने सिद्ध झालेले आहे तर शुद्धी जाणिवेवर केलेला संकल्प त्यापेक्षा कितीतरी पटीने प्रभावी असणारच यात संशय कसला ?

कारण असा संकल्प शुद्ध जाणिवेवर झालेला असल्याने तो साक्षात् परमेश्वराचाच संकल्प आहे हे निश्चितपणे जाणण्यास कोणती हरकत आहे ?

अशा रितीने बाबांचा संकल्प उदीमध्ये संक्रमित होत असे. यालाच बाबांनी आपले चैतन्यमय अस्तित्व उदीत राखले होते असेही म्हणता येईल. म्हणूनच शुद्ध जाणिवेने ( साक्षात् परमेश्वराने ) निर्माण केलेली उदी अत्यंत शक्तिशाली असणारच किंबहुना ती " सर्वशक्तिमानच " आहे असे म्हटल्यास मुळीच चुकीचे ठरणार नाही म्हणून मघाशी दिलेले समीकरण पुन्हा सुधारून लिहिले तर–

ईश्वरी संकल्प + भक्तांची श्रद्धा = गुण ( प्रचिती, कार्यसिद्धी ) असे होईल.

परंतु उदी जर सर्वशक्तिमान आहे असे जर म्हटले आहे तर उदीच्या साक्षाने काही अघटित घटना घडू शकतील काय ? ( उदा. मेलेला माणूस जीवंत होईल का? किंवा पांच लाखाचे लॉटरीचे बक्षीस लागेल काय ? ) असा प्रश्न कोणीही सहाजिकच विचारील तर त्याचेही उत्तर निःसंशयपणे " होय " असेच द्यावे लागेल. कारण सर्वशक्तिमान परमेश्वरास अशक्य काय ?

पण प्रत्यक्षात मात्र तसे घडताना दिसत नाही. किंवा काही जणांना साध्या सुध्या गोष्टीतही काही अनुभव येत नाही याचे कारण काय ?

तर, याचे कारण म्हणजे भक्तांतील ऋणत्वशक्तीतील न्यून होय.

**भक्तांचे ऋणत्व :**

सर्वांना उदीचा सारख्या प्रमाणात अनुभव येत नाही याचे कारण आपण "श्रद्धा कमी" असे म्हणून जातो ते एकदम बरोबर आहे म्हणून श्रद्धा म्हणजे नक्की काय ते आपण प्रथम पाहू.

या ठिकाणी एक तत्त्व आपणास ठाऊकच असेल की, शिक्षक उत्तम असून केवळ भागत नाही तर विद्यार्थीदेखील तितकाच उत्तम असावा लागतो. पन्नास मुले पटावर असली तरी त्यातील केवळ पाच सहाच विद्यार्थी खरे घेणारे असतात. म्हणून देणारा हवा तसा घेणाराही तितक्याच योग्यतेचा हवा. म्हणून जो तो आपल्या योग्यतेइतकेच घेत असतो हेच खरे !

आणि शास्त्रानुसार पाहिले तरी, शक्ती वाहण्याकरिता धन (Positive) व ऋण (Negative) अशा दोन्ही ध्रुवांची गरज असते. इलेक्ट्रिकल प्रवाह नेताना देखील दोन्ही ध्रुवाकरीता सारख्याच अ...च्या (शक्तीच्या) तारा वापराव्या लागतात. तरच प्रवाह उत्तम रीतीने वाहू शकतो अन्यथा फ्युज उडतो.

या ठिकाणी वरील प्रमाणेच भक्तांच्या ऋण शक्तीमध्ये कमी अधिक फरक असतो.

श्रीबाबांच्या संकल्पाने उदीमधून येणारी शक्ती धन (Positive) आहे. हे लक्षात घेतले तर भक्तांची स्वीकारण्याची शक्ती ऋण (Negative) आहे. हे सुद्धा लक्षात घ्यावे लागेल.

अर्थात्च भक्तांची ऋणशक्ती तितक्याच महत्वाची असून तिच्यावरच प्रचितीचे मोजमाप ठरते. म्हणून ही ऋणशक्ती जितकी अधिक कार्यशील तितकी प्रचितीही अधिक. ही अत्यंत महत्वाची गोष्ट लक्षात येईल. या गोष्टीला बाबांचे शब्दात सांगायचे तर,

"जो जो मज भजे जैशा जैशा भावे, तैसा तैसा पावे मीही त्यासी।"

किंवा

तू माझ्याकडे पहा। मी तुझ्याकडे पाहीन॥

या ठिकाणी पहा म्हणजे एकाग्रतेने पहा असा अर्थ आहे हे उघड नाही का? तू एकाग्रतेने माझ्याकडे पाहिलेस की, तुझ्या बहिर्मनाचे व्यापार बंद होतील. व

एकदा का हा मार्ग मोकळा झाला की, माझ्यातून निघणारे दिव्य किरण तुझ्यात ( अंतर्मनात ) कसे शिरतात ते तर पहा.

यावरून आपल्या ऋणत्वांस किती महत्व आहे हे स्वतः बाबांनीदेखील अनेक वेळा अनेक प्रसंगी आपल्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला आहे.

म्हणूनच योग्य ऋणत्व राखले नाही तर, दिव्यत्वाचा पाऊस पडला तरी, तो व्यर्थच जायचा. झाड उगवायला जमीन सुपीक हवी ! म्हणूनच आपल्या बर्हिमनाचे व्यापार बंद व्हायला हवेत. तेव्हाच बाबांच्या दिव्य शक्तीचा आपल्या अंतकरणात प्रवेश होऊ शकेल.

परंतु होते काय की, समजा आपण वर उदाहरण दिल्या प्रमाणे लॉटरी तिकीट खरेदी केले. किंवा अन्य तत्सम गोष्टी बद्दल बाबांना साकडे घातले तरी ते वरवरचे असते. कारण आपल्या स्वतःलाच ते अशक्य वाटत असते. आपल्या मनात विचार येतात. " आपण हे असे ! आपल्याला कसले पाच लाखाचे बक्षीस लागते ! आपले नशीबच फुटके ! त्याला बाबा तरी काय करणार ? वगैरे.

येथेच आपली नेमकी चूक होते. वास्तविक अनंत कोटी ब्रह्मांडाचा नायक श्रीसाई भगवान त्याला अशक्य काय ? या गोष्टीलाच शहाण्यांनी.

प्रयत्नांती परमेश्वर

असे म्हटले आहे. पूर्ण विश्वास असला की, योग्य प्रयत्न आपोआपच होतो. आणि योग्य प्रयत्न झाला की, कार्यसिद्धी झालीच समजा ! असो परंतु सायन्स शिकलेले आपले मन कुठेतरी विचलीत होत रहाते. त्यामुळे ऋणत्वास तडा जातो. बर्हीमनात विचाराचा गोंधळ उठतो, व आपल्यामध्ये येऊ पहाणाऱ्या संतांच्या अनंत शक्तीला मर्यादा घातली जाते. म्हणून हे ऋणत्व जितके जितके म्हणून कमकुवत होत जाते. तितके तितके प्रचिती येण्याचे प्रमाणही खाली-खाली येत जाते.

उदीची कार्य प्रणालीः

बाबांचा देह नाममात्र होता. त्यांचे खरे स्वरूप म्हणजे त्रिखंडात भरून उरलेले त्यांचे आदी अंतरहीत चैतन्यस्वरुप होय. म्हणून बाबांना आपल्या पर्यंत पोहचण्या साठी कसल्याही माध्यमाची गरज नाही. कारण माध्यम म्हणून जे काही आहे सर्व त्यांच्यामध्ये आहे.

परंतु बाबांना नसली तरी माध्यमाची गरज आपल्याला आहे. म्हणून बाबांनी उदीची माध्यम ( medium ) म्हणून योजना केल्याचे लक्षात येईल. श्रीबाबांनी

...त्य संकल्पाने संक्रमीत झालेली उदी जेव्हा आपल्या सन्निध असते तेव्हा. एकादा निर्विकार क्षण साधून बाबांचा संकल्प आपल्या अंतर्मनात शिरतो, व आपली आकांक्षा फलद्रुप होते.

ह्या निर्विकार मनाचे महत्व, बाबांची उदी लावण्याची पद्धत लक्षात घेतली की चटकन लक्षात येईल. बाबा उदी लावताना तीन बोटांनी मस्तकावर आघात करीत असतानाच आंगठ्याने उदी लावीत असत.

याचे कारण आपल्या डोक्यावर आघात झाला. असता आपल्याला काही क्षण भिरभिरल्या सारखे वाटते. म्हणजे निमिषार्धाकरिता का होईना आपले भान नाहीसे होते. म्हणजेच आपण अंतर्मुख झाल्याने बाह्य जगाचे अस्तीत्व विसरतो. कारण आपले बर्हिमन बाह्य जगातून निवृत्त होऊन आत वळल्याने तो काळ निर्विकार स्थितीचा असतो. बाबांचे बोटाच्या आघाताने हेच बहुधा साध्य होत असावे. किंवा ...ार्थाने म्हणावयाचे झाल्यास बाबा तीन बोटांच्या आघाताने आपले विचार चक्र ...वित असत. कारण हाच क्षण बाबांचा संकल्प आपले अंतर्मनात शिरण्यास योग्य ...सतो. कारण तो अंतर्मनात शिरल्याखेरीज फलद्रुप होणार कसा ?

म्हणून वरील समीकरण पुन्हा थोडी सुधारणा करून मांडले तर,

ईश्वरी संकल्प + भक्तांचे अंतर्मन = गुण ( प्रचिती, कार्यसिद्धी )

म्हणून साईभक्तानो असं आहे श्री साईबाबांच्या उदी मागचे मानसशास्त्र ...पल्या परमभाग्याने आपल्याला श्री साईबाबांसारख्या महान शक्तीचे कृपाछत्र ...ाले आहे. ती शक्ती आपणास वाटेल ते देण्यास समर्थ आहे. परंतु त्याकरीता ...ण आपले बाहेर भटकणारे मन एकाग्र करून ते बाबांच्या चरणापाशी सतत ...ले पाहिजे.

अशा रीतीने बाबांच्या चैतन्य स्वरुपाशी तुमचा आंतरीक संबंध जोडला गेला ...कदाचित तुम्हाला उदीच्या बाह्योपचाराची गरजही उरणार नाही. कारण तोपर्यंत ...साईसमर्थांची साक्षात मूर्ती तुमच्या अंतःकरणात प्रगट झालेली असेल.

आणि एकदा का बाबांची मूर्ती तुमच्या अंतरी प्रगट झाली की, तुमचा संसा... ...ाय पण तुमचे सारेच आयुष्य मंगलमय होईल. दुःख संकटे तुमच्या वाऱ्यालाही ... राहणार नाहीत. कारण तुमच्या अंतरात त्यावेळी फक्त आनंदाचे डोही आनंद ... उठत असतील. तोच सच्चिदानंद होय. हा सच्चिदानंद या जीवनातच काय ...मृत्यू नंतरही तो कोणी कदापी तुमच्याकडून हिसकावून घेऊ शकणार नाही.

कारण मृत्यूनंतरही तुम्ही श्रीसाईंच्या चरणाशी पोचले असाल. आणि मग तेथून परत येणेंच नाही. केवळ आनंदी आनंद भोगत राहयचे आपल्या साईमाऊलीच्या कुशीत.

तुम्ही म्हणाल याला पुरावा काय ? तर आता देखील तुम्ही त्याची ओझरती का होईना गोडी चाखता ना ? केव्हा म्हणाल तर—जेव्हा तुही शिर्डीला जाता... समर्थांच्या समाधीजवळ थांबता किंवा द्वारकामाईच्या मांडीवर बसलेले असता, तेव्हा एकदातरी असा क्षण येऊन जातो की, तेव्हा तुम्ही घरदार, नाती गोती, नोकरीधंदा इत्यादी सारे काही विसरून जाता, एक निर्मळ असा आनंद. (Pure Bliss) तुमच्या मनाला वाटत असतो. कारण त्याक्षणी तुमच्या एकाग्र झालेल्या मनाने साईबाबांच्या चैतन्यस्वरुपातून निघणारा सच्चिदानंदाचा कण टिपलेला असतो. हे सच्चिदानंदाचे किरण साक्षात् देवापासून सुद्धा मिळत नाहीत. म्हणून तर नामदेव निराश होऊन म्हणाले—

उच्छीष्टांचे शीत न देवा टाकीसी बाहेरी। हरी तु मोठा घातकी।

पण तेच उच्छीष्टाचे भोजन श्रीसाईबाबा मुक्त हस्ताने उधळीत बसले आहेत. त्यातील एक शरी टिपला तरी त्याचा आनंद किती असतो ! तो आपण शिर्डीहून घरी परतल्यावर देखील आठ-आठ दिवस विसरतच नाही. त्या आठ दिवसात डोळयापुढे सारखी शिर्डी आणि बाबाच दिसत असतात. मनालाही आनंद वाटत असतो. मन कसे तृप्त व मस्त असते.

असे आपल्या उच्छीष्टाचे भोजन खाऊ घालणाऱ्या—

सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय !

## साईभक्त रामनाथ समेळ यांचे निधन

गिरगावातील साईभक्त आणि छायाचित्रकार श्री. भोलानाथ समेळ यांचे वडील श्री. रामनाथ खंडेराव समेळ इगल ऑटोरिपेर्स व मोटार ड्रायव्हिंग स्कूल या संस्थेचे संस्थापक हे १०–७–८१ रोजी वयाच्या ७९ वर्षी श्रीसाईचरणी मुंबईत विलीन झाले. ते साईबाबांचे एक निष्ठावान भक्त होते व आपल्या उद्योग व्यवसायात सचोटीने वागत असत. आम्ही श्री समेळ यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.

श्रीसाईबाबा मृताच्या आत्म्यास सद्गती व चिरशांती देवोत.

The need fo
in SHIRDI i
SAI E
INTERNATI
OPP. SAIPRASAD NEW
TAL. KOPARGAON. DIS
* EXCELLENT DECOR
ROOMS WITH ATT
* VEGETARIAN AND
DINING HALLS
* ALL TYPES OF PU
LABLE.

SHIRDI-PHONE –
55, 56, 57

# ....श्रीसाईनाथ सहाय्या धावती....

—कु. अरुणा प्रभू
२, साई-सदन, आरेरोड,
गोरेगाव ( पूर्व ) मुं. ४०००६३

● 'श्रीसाईलीला' मासिकातील बाबांच्या भक्तांचे अनुभव वाचत असताना माझ्याही मनात विचार येत असे की खरंच बाबांचा अनुग्रह होण्याचे भाग्य मला कधी लाभेल का ? आणि खरोखरच बाबांनी माझी प्रार्थना ऐकली. तोच अनुभव मी येथे देत आहे.

१९७८ साली मी बी. ए. ला असताना परीक्षेच्या आधी पंधरा दिवस टायफॉईडने आजारी पडले. माझी परीक्षा चुकली, व नंतर डॉक्टरांच्या सांगण्यावरून हवापालट करण्यासाठी मला माझ्या गावी ( सावंतवाडीला ) नेण्यात आले. त्याच वेळी मला स्टेट बँकेचा इंटरव्ह्यूसाठी कॉल आला. तो मुंबईच्या पत्त्यावर आला असल्या कारणाने माझ्या बहिणीने तो रिडायरेक्ट केला व मला तो सावंतवाडीला बरोबर इंटरव्ह्यूच्या आदल्या दिवशीच मिळाला. एका दिवसात मुंबईला पोहोचणे शक्य होते परंतु डॉक्टरनी मला बिछान्यावरून हलण्यास सक्त मनाई केली असल्याने माझा धीरच खचला. एकीकडे परीक्षा चुकली आणि दुसरीकडे हातचा इंटरव्ह्यूही जाणार म्हणून मी फारच निराश झाले. मानवी उपाय संपले की माणसाला परमेश्वराची आठवण येते असे म्हणतात व माझ्या बाबतीतही तेच झाले. शेवटी मला श्रीबाबांचीच आठवण आली व मनोमन विश्वास वाटू लागला की श्रीसाईबाबाच मला या संकटातून वाचवतील. मी मुंबईहून येताना आणलेल्या श्रीसाईबाबांच्या तसबिरीसमोर हात जोडून उभी राहिले व बाबांची करुणा भाकून म्हटले, "बाबा आतापर्यंत मी फक्त तुमच्या भक्तांचे अनुभव वाचले. आज खरोखरच तुमची मुलगी संकटात आहे तेव्हा मला तारणं सर्वस्वी तुमच्याच हाती आहे." इकडे माझ्या वडिलांनी टेलिग्राम करून ( स्टेट बँकेच्या मुंबई ऑफिसमध्ये ) मी आजारी असल्याने दिलेल्या तारखेला इंटरव्ह्यूला हजर राहू शकत नाही तरी माझा इंटरव्ह्यू पुढे ढकलण्याबाबतची विनंती केली. तसेच माझी आते बहीण त्याच दिवशी मुंबईला यायला निघाली होती. तिच्याबरोबरही माझे मेडिकल सर्टिफिकेट पाठविले. पण डॉक्टर व स्टेट बँकेच्या सावंतवाडी शाखेचे अधिकारी यांनी सर्टिफिकेटचा काही उपयोग होणार नाही असे सांगितले. तरीही माझ्या आते बहिणीने माझ्या आग्र

वरून मुंबईला पोहोचल्यावर बँकेच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन माझा इंटरव्ह्यू पुढे ढकलण्यात यावा अशी विनंती केली. तेथील अधिकारी म्हणाले की, एकाच उमेदवाराचा इंटरव्ह्यू पुढे ढकलता येणार नाही तरी आमच्या इंटरव्ह्यू कमिटीपुढे हा अर्ज व मेडिकल सर्टिफिकेट ठेवून प्रयत्न करीन. अखेर श्रीबाबांनी त्यांना बुद्धी दिल्याने त्यांनी माझा इंटरव्ह्यू २२ दिवस पुढे ढकलला, व तसे पत्र मला चार दिवसांनी मिळाले त्यावेळी मला जो आनंद झाला तो अवर्णनीय होता. आपण इंटरव्ह्यूला हजर राहू शकू यापेक्षाही माझी हाक बाबांनी ऐकली. म्हणून मला पराकोटीचा आनंद झाला. अशा प्रकारे बाबांच्या कृपेने माझा इंटरव्ह्यू चांगल्या प्रकारे होऊन त्यात पास होऊन मला बँकेत नोकरी लागली.

त्यानंतर लगेच ऑक्टोबरमध्ये मला बी. ए. ची परीक्षा द्यायची होती. परंतु युनिव्हर्सिटीने तेव्हा ती परीक्षा रद्द केली. आधीच आजारपणामुळे अतिशय अशक्तपणा आला होता व त्यातच परीक्षा पुढे ढकलल्याने अभ्यासावर साफच पाणी पडले. अचानक डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात युनिव्हर्सिटीने जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात परीक्षा घेण्याचे जाहीर केले. चार-पाच महिने पुस्तकांना आजिबातच हात लावला नव्हता त्यात अशक्तपणामुळे अभ्यास करण्याचा उत्साहही नव्हता. नोकरीतही नवीनच असल्याने सुट्टीचाही प्रश्न होता. यावेळी पुन्हा बाबांनाच हाक मारली व म्हटले. ' बाबा वेळोवेळी आतापर्यंत सर्व संकटातून तुम्हीच माझे रक्षण केलेत, यावेळीही तुम्हीच मला वाचवा. मला अभ्यास करण्याची बुद्धी द्या व वेळ फारच कमी असल्याने मी केलेल्या पोर्शनवर पेपर येऊन ते मला चांगल्याप्रकारे लिहिता येऊ देत. ' माझ्या आईचीही बाबांवर नितांत श्रद्धा आहे. तिनेही मला बाबांवर विश्वास ठेव व निश्चित रहा असे सांगितले. त्यामुळे बाबांवरील माझी श्रद्धा अधिकच दृढ झाली, आणि खरोखरच यावेळीही बाबा माझ्या हाकेसरशी धावून आले त्यांच्या कृपेनेच मी प्रोबेशनवर असतानाही मला १० दिवसांची रजा मिळाली परीक्षेतही अपेक्षित प्रश्न आल्याने माझ्या आश्चर्याला पारावारच उरला नाही. त्यामुळेच मी सर्व पेपर चांगल्या प्रकारे लिहू शकले व श्रीसाईकृपेनेच मला बी. ए. सेकंड क्लास मिळाला.

शरण मज आला आणि वाया गेला दाखवा, दाखवा ऐसा कोणी हे श्रीसाईंचे वचन बाबांनीच सर्वार्थाने माझ्या प्रत्ययास आणून दिले व मला धन्य केले. त्याचसाठी हे दोन्ही अनुभव ' श्रीसाईलीला ' मासिकात द्यावे अशी इच्छा झाली म्हणून मी हे दोन्ही अनुभव वाचकांसमोर ठेवत आहे. अशीच बाबांची कृपादृष्टी आमच्यावर राहो हीच माझी श्रीसाईचरणी प्रार्थना आहे.

☆

# सुख असे तुमचे हाती !

—श्री. महादेव दत्तात्रय भिडे
चंद्रकिरण, ११९५ सदाशिव पेठ, पुणे, ३०

**( संताचे एकादे वाक्य संताचा सहवास त्यांची कृपादृष्टी याने मन ताळ्यावर येते ते स्थीर होते व सन्मार्गाला लागते. )**

● मनुष्य जन्माला येतो तो आपले पूर्वकर्म घेऊन. जन्मापासून देह सोडीतो पर्यंत त्याला येणारी सुख दुःखे भोगावी लागतात. ती कोणाला चुकत नाहीत. ती भोगत असताना मनुष्य हैराण होतो वेडाही होतो अतीसुख अगर अती दुःखही नाशाला कारणीभूत होतात. सुखाचे दिवस कसे जातात हे समजत नाही. पण दुःखाचे दिवस संपताना मनाचा तोल सुटतो. देव धर्म निच्च करणारी माणसेही ह्याप्रसंगी देव तरी आहे का ? ह्या संभ्रमात पडतात. त्यांची श्रद्धा ढळते. काही वेळातर घरचे देव पाण्यात घालून त्याला शिक्षा देतात. असे का व्हावे ! एकदा एके ठिकाणी मी गेलो असताना देवाचा फोटोच जमीनीवर आदळून अतीरेक केलेला आढळला. अशा करण्याने दुःख कमी होत नाहीच देव फक्त हसतो.

पंच कर्मेंद्रिये व पंच ज्ञानेंद्रिये या बरोबरच मनही परमेश्वराने मनुष्य जन्माला घालताना दिलेले आहे. पण त्याबरोबरच विवेक ( बुद्धी ) ही देऊन ठेविला तो मनाला पायबंद घालण्यासाठीच मन हे वासने मागे धावते. इच्छापूर्ती झाली की त्यास आनंद होतो, व जर इच्छेप्रमाणे वासना तृप्ती झाली नाही की ते दुःखी बनते. मनाला होणारे सुख दुःख हे मनावरच अवलंबून आहेत. स्वकर्म शुद्ध असताना मन त्याला सकामीक बनविते, व त्याप्रमाणे चांगले अगर वाईट कर्म घडविते. मन इंद्रियांचा राजा आहे. काम क्रोध हे त्याचे सेनापती होत. त्यांच्या माऱ्यापुढे देवही पतन झालेले आपण वाचतो. चंद्र क्षयरोगी बनला. ब्रह्माला वाईट कर्म करावयास लागले. शंकराला ऋषीनारींचा अभिलाष होऊन त्याचे पतन झाले. मनाला जिंकणारे देव, दानव, मानव हे दुर्बल ठरले. संताचे एकादे वाक्य, संताचा सहवास, त्यांची कृपा त्यांची दृष्टीनेही मन ताळ्यावर येते. स्वैर भटकणारे मन स्थीर होते. व सन्मार्गाला लागते.

मन अती चंचल स्वैर भटकणारे पण अत्यंत भित्रे व दुर्बल आहे. "वाजे पाऊल आपले म्हणे मागे कोण आले" का इतके भिऊन जाते. पण त्याबरोबर अत्यंत ...छवे तसे अत्यंत क्रूरही आहे. कोणाचाही घात करण्यास कमी करत नाही.

मनाचे हे गुणधर्म ओळखून संतानी त्याला आपलासा करण्याचा प्रयत्न वेळोवेळी केला. समर्थ रामदासांनी मनाचे श्लोक लिहून त्याला चांगले कोणचे, वाईट कोणचे, हितकारक काय ? हित कसे करावे यांचा उपदेश केला व मनाला भक्ती मार्गाला लावले. हे उपदेश मनाला पटविण्यासाठीच मनाचे श्लोक नित्य पहाटे आपल्या शिष्याचेद्वारे जय जय रघुवीर समर्थ, या गजराने गल्लोगल्ली हिंडून प्रयत्न केला. कोणतीही गोष्ट वारंवार तीच तीच सारखी सांगत राहिली तर ती कालांतराने खरी वाटू लागते. याचाच उपयोग मनाचे सुखदुःख भोगताना जर केला तर मनुष्याला दुःख होणार नाही. प्रपंचात सुख दुःखाचे प्रसंग वरचेवर येतात. तसे ते जातात. काही काळ जावा लागतो इतकेच.

मन बुद्धी पैसा अनुकूल परिस्थिती असताही अत्यंत परिश्रम करूनही एखादी गोष्ट साध्य होत नाही. अपयश येते. तेव्हा असे का ? घडले यांचा विचार प्रत्येक वेळी जर मनुष्याने केला तर त्याचा उलगडा त्याचे मनच त्याला करू लागते. ते सांगते 'अरे तुझ्या हाती काही नाही. सर्व सूत्रे परमेश्वराचे हाती आहेत. तू फक्त त्यांच्या हातचे बाहुले आहेस. तू दुःख कशाला करतोस. काय ? तुजजवळ शक्ती बुद्धी पैसा नव्हता ! नीयतीच्या हाती सर्व आहे तीच सारे घडविते' पण सारखे त्यास सांगून पटवावे लागते. मनच मनाला पटविते.

मन स्वैर वागू लागताना त्याला चांगले, वाईट कोणचे हे बुद्धी त्याला सांगत असते. विवेक मनाला आवरू शकतो. 'मना सांग बा रावणा काय झाले, अकस्मात ते राज्य सर्वे बुडाले.' हे सांगण्याने धन लोभापासून तो आवरतो. काळ हा पाठीमागे लागला आहे. तुझा देह केव्हा धरणीवर पडेल याचा नेम नाही. जाताना सर्व येथेच टाकून जावे लागणार ! ह्या उपदेशाने ते सत्कर्माला लागते. भक्ती मार्गाचा अवलंब करते. अर्जुनासारखा रणधुरंधर रणक्षेत्रावर स्वबांधवाना मारावे लागणार. आपले हातून महापातक होणार या चिंतेने विचाराने तो दुबळा झाला. युद्धच नको म्हणू लागला. तेव्हा भग वंतानी त्याला नानाप्रकारे साम दाम दंड भेद प्रकारे समजावले. देह नश्वर आहे. आत्मा अमर आहे. मरणारा व मारणारा तू नसून तू निमित्त मात्र आहेस. हे सर्व सैन्य मीच मारले आहे. हे विराट स्वरूपात दाखविले व त्याला युद्ध करावयास लावले.

प्रपंच किंवा संसार हे एक युद्ध क्षेत्रच आहे. यात सुख दुःखाने घायाळ होणारे प्रसंग वारंवार येणारच. प्रपंच, संसार हा करावा लागणारच. तो काही सुटू शकत नाही. त्यातून सुटण्यासाठी आत्महत्या करण्याचे प्रयत्न पुष्कळ होतात. देहाचा नाश करावा म्हणून पुलावरून नदीत उडी घेणार इतक्यात त्याला मागे ओढणारा

कोणीतरी भेटतोच. तो त्याला मरू देत नाही. दैव त्याला जगूही देत नाही व मरूही देत नाही अशा अवस्थेत मनुष्य विचार करू लागतो व सन्मार्गाला लागतो.

दुःखे ही मनुष्याला सन्मार्गाला लावणारी साधने आहेत. स्वतःस जन्मास घालणाऱ्या परमेश्वराची आठवण सतत रहावी हाच हेतू परमेश्वराचा दुःख देण्यात तर नसेल ? होय तसेच आहे ! परमेश्वराची आठवण राहावी, त्याची उपासना व्हावी सत्वगुण वाढून त्यायोगे मनुष्याने नरजन्माचे सार्थक करावे व त्याने स्वस्वरुपी मिळावे यासाठीच दुःखे दिलेली आहेत. उपासना वाढू लागली की सतकर्मे घडू लागतात; वाईट कर्मेच घडत नाहीत. यासाठी श्रद्धा व सबुरी मात्र हवी. श्रीसद्‌गुरु साईबाबांनी येणाऱ्याला श्रद्धा, सबुरी याचाच सारखा उपदेश केला. याने भक्ताची दुःखे दूर झाली आहेत. " श्रद्धा सबुरी ठेवा " कर्ता करविता ईश्वर आहे, आपण त्याची बाहुली आहोत. कर्म ईश्वरी इच्छेनेच घडते. हेही दिवस जातील. " नर करे तो नरका नारायण हो जाय ! " ही संताच्या शिकवणीची बोधपर वाक्ये जर घरोघर लावून ठेवली तर ती वाचनात नित्य येत राहतील. त्याचा परिणाम मनावर झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे त्याला होणारी दुःखे पुष्कळच कमी होण्यास मदत होईल. संत वाक्याच्या सतत स्मरणाने, वाचनाने दुःखे भोगताना मनुष्याला जाणीव राहणार नाही. मनुष्य दुःख मुक्त होईल. संत दुःखे कमी करत नाहीत. ती भोगताना मनाला होणारे क्लेश विसरण्यासाठी ते त्याला अशा एका अवस्थेत नेतात की तो दुःख विसरतो. सुख पाहता जवा पाडे । दुःख पर्वताएवढे नसून सुख पर्वताएवढे असे वाटण्याची मनुष्याची मनःस्थिती तयार होते. म्हणून संताच्या वाक्यावर, सांगण्यावर विश्वास ठेवा यात सर्व काही सुखाची किल्ली आहे. तुमचे सुख तुमचे हाती आहे हे अनुभवानेच कळून येईल.

मानवाची दुःखे दूर करण्यासाठीच संतांचे अवतार आहेत. विश्वाची चिंता, वाहणारे समर्थ रामदास. दुःखे पाहून व्यथित होणारे संत तुकोबाराय. समाजाला लागलेली श्रेष्ठ भावनेची कीड घालविणारे संत ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान व मुक्ताबाई व योगीराज. गरीबांची दुःखे पाहून ती स्वतःचीच दुःखे समजून ती दूर करणारे श्रीसाईबाबा, सर्वाभूती परमेश्वर पाहणारे संत एकनाथ. या संताच्या शिकवणीप्रमाणे आपण जाऊया व सुखी होऊया !

★

# या दिघेंना बाबांनी शिर्डीस बोलावले

—श्री. वि. स. महाबळेश्वरकर
रामदास निवास, ब्रा. सो.
नौपाडा, ठाणे २

● प्रथमतः शिर्डीस प. पू. सद्गुरु श्रीसाईबाबांनी स्वतः बोलावून शिर्डीस नेलेले श्रीधर जनार्दन दिघे हे मोठे भाग्यवान गृहस्थ होत. श्रीसाईबाबांनी आपल्या हाताने त्यांना तीन प्रसादग्रास भरवले त्या क्षणापासून या श्रीधरपंताचे जीवनात सच्चितानंद भरला.

एके दिवशी मनात आले म्हणून हे श्रीधरपंत केडगावी गेले श्री नारायणमहाराजांचे दर्शनासाठी त्यांचे जवळ जाताच ते त्यांना म्हणाले, "तुम्ही मोठ्या सद्गुरुकडून कृपा मिळविलीत. तुम्ही माझे पाया नाही पडायचे! इतके बोलून महाराजांनी त्यांची बॅग वगैरे सामान मागवले व आपलेच खोलीत त्यांना तीन दिवस ठेऊन घेतले. इतकेच नव्हे तर काही दिवस जाताच श्रीधरपंताना बरोबर घेऊन गोकर्ण महाबळेश्वराची यात्राही त्यांना घडवली.

शिर्डीस जाऊन साकोरीसही श्री उपासनी महाराजांनी या श्रीधरपंतांचा मान केला.

इ. स. १९१५ चा समार श्रीधरपंत म्हणजे त्यावेळेचा श्रीधर, श्रीसाईनाथांच्या चरणदर्शनासाठी गेला असता श्रीसाईनाथांनी त्याला आज्ञा केली "अरे, आता नाशिकला जा व रामाचे दर्शन घे व तसाच घरी परत जा"

खिशात पैसे नव्हते परंतु पाठीशी सद्गुरु होते. श्रीधर तावडतोब कोपरगाव स्टेशनवर गेला व तेथून पुढे नाशिक स्टेशन गाठले. गाडी थांबली श्रीधर प्लॅटफॉर्मवर उतरला तोच स्टेशनमास्तरने हेड टी. टी. आय. यास बोलावले. तो आला व या श्रीधराच्याच रोखाने येऊन त्याने विचारले "तुला कुठे जायचे आहे? श्रीधर जवळ तिकिट नव्हते नि पैसेही नव्हते तो मनातून भ्याला व म्हणाला" बाबा आता तुम्हीच पहा काय ते! टी. टी. आय. यास उघड म्हणाला. "मला गावात श्रीरामाच्या दर्शनाला जायचे आहे.:"

त्या तपासनीसाने श्रीधरास हाताने धरले व झटकन बाहेर घेऊन गेला. समोरच एक घोड्याची ट्राम उभी होती. त्या ट्रामला हात करून "श्रीधरास रामाचे देवळाजवळ उतरवा" असे सांगितले. कोणीही पैसे मागितले नाहीत. मानाने देवळात पोहोचविले.

देवळात जाऊन श्रीधराने रामाचे दर्शन घेतले व गाभाऱ्यातून बाहेर येताचा सभागृहात डावीकडे बसलेले आळंदीचे यती श्रीनृसिंह सरस्वती श्रीधरास म्हणाले "क्यों रे लडका, तेरेकुं बुढ्ढेने भेजा हैं न।" अरे तुला श्रीसाईनाथांनी येथे पाठवले ना ? मग ये बैस इथं !

साहजिक या यतींचे भक्तांमध्ये कुतुहल निर्माण झाले. हा भाग्यवान मुलग, कोण असावा ? भोजनासाठी आता घरी जाताना याला न्यावे म्हणून जणू चढाओढ लागली. इतक्यात एक द्राक्षाचा व्यापारी आला व महाराजांची अनुज्ञा घेऊन श्रीधरास घरी घेऊन गेला.

भोजन होताच दोन करंड्या द्राक्षे बरोबर देऊन श्रीधरास या व्यापाऱ्याने नासिक स्टेशनवर आणले व बाकावर बसवले. आत जाऊन दुसऱ्या वर्गाचे तिकिट काढले व स्टेशनमास्तरांना घेऊनच बाहेर आले. जवळ येताच स्टेशनमास्तरने श्रीधराचे पायावर डोके ठेवले. श्रीधराचे अष्टभाव जागृत झाले व म्हणाला, "बाबा, काय हे !"

आरामात झोप काढून श्रीधर मुंबईस परत आला.

बरोबर ६२ वर्षांनी श्रीधर जनार्दन दिवे उर्फ नाना दिवे शिर्डीस गेले असता शिर्डीचे भव्य रूप पाहून त्यांना आनंद वाटला. परंतु आपली सोय कशी करावी हे त्यांना कोडे पडले. जाता जाता संरक्षण अधीक्षकाचे कचेरीत जाऊन ते म्हणाले, "आपण येथे या कार्यालयाचे मुख्य का ? उत्तरी होकार येताच श्री नाना म्हणाले, आज शिर्डीचे स्वरूप बदलले आहे. खूप मोठा पसारा वाढलेला दिसतो.

"आपण मागे कधी आला होतात इथे ?" अधिकारी म्हणाले. नाना सांगू लागले 'साठ वर्षांपूर्वी येथे आलो होतो. श्रीसाईबाबांनी मला तीन घास हातानी भरवले.'

इतुके ऐकताच द्वारकामाई मशिदीसमोरील खोलीत श्री. नाना व त्यांचा मुलगा यांना जागा दिली. तैनातीसाठी दोन नोकर आले.

दुसरे दिवशी सकाळी एक ब्राह्मण आला त्यांनी श्री. नाना व त्यांचे चिरंजीव व सुनबाई यांना स्नान करून येण्यास सांगितले. समाधीवर अभिषेक व श्रीसत्यनारायण पूजा सांगितली. यथोचित अशी पूजा करून श्रीनाना ठाणे मुक्कामी परत आले.

ही त्या परमकृपाळू श्रीसाईबाबांची कृपा आहे असे श्री. नाना नेहमी सांगायचे.

२६ डिसेंबर १९८० या दिवशी मजजवळ उद्गार काढले 'आजवर श्री साईबाबा काही मागितले नाही. त्यांनी मला खूप दिले. एकच आता विनवणी की त्यांनी मला त्रास न होता सुखाने मला न्यावे.' ही प्रार्थना बाबांनी ऐकली व ३१-१२-१९८० या दिवशी पू. श्री. नाना श्रीसाईनाथ रूपात विलीन झाले.

आपले जीवनपुष्प त्या महानद्याचे चरणी वाहिले. धन्य ते नाना !


# पायाचे उपचार केंद्र

**श्री संत पाचलेगावकर महाराज यांनी त्यांच्या मुक्तेश्वर आश्रम पवई येथे वरील उपचार केंद्र उघडले आहे.**

**पेडीक्युरीस्ट डॉ. उद्धव त्रिंबक बल्लाळ हे पायाचे तज्ञ पायाच्या अनेक दुखण्यावर उपचार करतात.**

डॉ. बल्लाळ ह्यांनी श्री. संत पाचलेगावकर महाराजांची मान्यता मिळविली आहे. त्याचप्रमाणे भारताचे प्रमुख उद्योगपती श्री. घनश्याम दास बिर्ला यांना सहा वेळा ट्रीटमेंट दिली आहे. त्याचप्रमाणे राज्यपालांच्या पत्नी श्रीमती शांती सादीक अली ह्यांनी सुद्धा प्रशस्तीपत्रक दिले आहे.

# श्री साईसचरित आणि व्यवहारी शिकवण

—श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग
कुर्ला (पश्चिम) मुंबई ७०

श्री साईसच्चरितात असे काही प्रसंग आहेत की त्यातून बाबा भक्तांना व्यवहारीक शिकवण देतात. ती अशी :

**प्रसंग १)** अण्णासाहेब दाभोलकर एकदा द्वारकामाईत बाबांचे पादसंवाहन करीत असता अण्णांच्या कोटाच्या वळयामधून फुटाणे खाली पडले ते पाहून बाबा म्हणाले ' ह्याला एकेकटे खाण्याची वाईट खोड आहे. '

**व्य. शिकवण**—कोणताही पदार्थ सेवन करताना त्यातील थोडा भाग आपल्याजवळ कोणी असेल त्याला प्रथम द्यावा व मग आपण सेवन करावा. जर आपल्या जवळपास कोणी नसेल तर बाबांचे स्मरण करून मग तो पदार्थ आपण सेवन करावा.

**प्रसंग २)** एकदा बाबांनी एका गृहस्थाला शिडी आणावयास सांगितले व या शिडीवरून ते राधाकृष्णा आईच्या घराच्या छपरावर चढले व लगेच दुसऱ्या बाजूने त्याच शिडीने खाली उतरले व उतरल्याबरोबर त्या शिडी लावणाऱ्या गृहस्थाला लगेच २ रु. दिले.

**व्य. शिकवण**—कोणाचेही श्रम फुकट घेऊ नयेत.

**प्रसंग ३)** एकदा भक्त मेघा आपला नेहमीचा पुजेचा क्रम चुकवून म्हणजेच खंडोबाची पूजा न करताच द्वारकामाईत बाबांची पूजा करावयास आला. तेव्हा बाबांनी सांगितले प्रथम खंडोबाची पूजा करून ये व मग माझी पूजा कर.

**व्य. शिकवण**—कोणतीही गोष्ट करताना त्यामधील क्रम आपण मोडू नये.

**प्रसंग ४)** रामदासाच्या पोथीतील विष्णू सहस्रनामाची पोथी बाबांनी शामाला दिली त्याबद्दल रामदासाने शामाशी अगदी अकांडतांडव केले. तेव्हा बाबा म्हणाले ' अरे रामदाशा, एवढ्या पोथ्या वाचून अजून तुझे अंतरंग शुद्ध नाही. '

**व्य. शिकवण**—क्षुल्लक गोष्टींसाठी कोणीही अकांडतांडव करू नये.

**प्रसंग ५)** एकदा बाबा लेंडीवरून परत येत असता एक डुकरीण मानव विष्ठेवर अगदी ताव मारत होती. ते पाहून बाबा म्हणाले 'त्या जिभेला त्या घाणीतच गोडी आहे.'

**व्य. शिकवण**—नेहमी दुसऱ्याचे दोष उगाळत बसून आपली जीभ विटाळून देऊ नये.

**प्रसंग ६)** बाबा व आणखी तिघेजण एकदा गर्द रानातून काही शोध लावण्यासाठी निघाले. तेव्हा वाटेत त्यांना एक वणजारी भेटला व तो त्यांना म्हणाला की तुम्ही थोडा भाकर-तुकडा खाऊन जा. परंतु बाबांशिवाय इतर तिघांनी त्याचे म्हणणे न ऐकता ते तसेच उपाशी पुढे गेले. परंतु बाबांनी त्याच्या जवळचा भाकर तुकडा खाल्ला व पाणी प्याले आणि नंतर बाबांना अकल्पित त्यांचे गुरु भेटले.

**व्य. शिकवण**—आपण कुठेही गेलो व आपल्याला तेथे खाण्याचा आग्रह झाला तर निदान त्यातील थोडा तरी भाग आपण खावा. परंतु अन्नाला पूर्ण नकार देऊ नये. म्हणजे आपले पुढील कार्य यशस्वी होते.

**प्रसंग ७)** एकदा नांदेडचे पुंडलीकराव राजमहेंद्री येथे श्री वासुदेवानंद सरस्वती यांचे दर्शनाला गेले. तेव्हा त्यांनी एक नारळ श्री साईबाबांना अर्पण करण्याकरीता पुंडलीकरावांजवळ दिला. पुढे एक महिना व्हायच्या आतच पुंडलीकरावांना काही मंडळीसह शिर्डीला जाण्याचा योग आला. परंतु वाटेत मनमाडला उतरल्यावर तो नारळ फोडला जाऊन चिवड्यात मिसळला गेला व शिर्डीला गेल्यावर जेव्हा बाबांनी नारळाची आठवण केली तेव्हा पुंडलीकरावांना फार वाईट वाटले.

**व्य. शिकवण**—आपल्याजवळ जर कोणी तिसऱ्या गृहस्थाला देण्यासाठी वस्तु दिली असेल तर ती वस्तू 'जशीच्या तशी' त्या गृहस्थाला द्यावी.

**प्रसंग ८)** बाळाराम मानकर हे भक्त बरेच दिवस शिरडीत वास्तव्य करून होते. एक दिवस बाबा त्यांना म्हणाले 'तू आता मच्छिंदरगडावर जाऊन रहा' मानकरांनी गडावर काही दिवस वास केल्यावर बाबांनी गडावर त्यांना दर्शन दिले.

**व्य. शिकवण**—बाबा केवळ शिरडीतच नाहीत तर त्यांचा सर्वत्र वास आहे.

# उदीचा महिमा

–श्रीमती मथुराबाई हिवारे
एम. ए.
सिंगारबाग, घ. नं १-८-२५
बीदर ( कर्नाटक)

* प्रथम जेव्हा आम्ही शिरडीस गेलो. परतताना बाबांची उदी घेतली. आम्ही रोज नेमाने ती कपाळी लावीत असू. पण त्याची खरी प्रचिती तेव्हा आली. एके दिवशी रात्री मला काही केल्या झोप लागेना व अंगाला खाज सुटली. त्यामुळे स्वस्थ झोप काही केल्या येईना. कंटाळून मासिक चाळले तरी झोपेचा पत्ता नाही. तेव्हा एकदम मला बाबांच्या उदीची आठवण झाली, व झटकन् उठून हातपाय धुतले अन् बाबांची उदी घेऊन थोडी तोंडात टाकली व थोडी हातात घेऊन अंग-भर चोळली. त्यावेळी मला असे काही समाधान लाभले की मी निश्चित होऊन झोपी गेले नि पहाटेच जागी झाले. उठल्यावरही खूपच बरे वाटत होते. अशी आहे जादू बाबांच्या संजीवनी उदीची.

आणखीन एकदाची घटना ती अशी माझ्या पतींची प्रकृती भयंकर बिघडली. कोणाकडे जावे काही कळेना. तशी त्यांची प्रकृति नेहमीच बिघडत असे. काय होते ते कळत नसे. पण एकाएकी बेचैन होऊन हातपाय ओढायला लागत. छातीत भयं-कर दुखत असे, व तास दोन तास हे दुखणे रहात असे. बाम घेऊन चोळल्यावर थोड्या वेळाने बरे वाटत असे. कित्येक दिवसापासून असे चालले होते. एके दिवशी ते ह्या दुखण्याने अस्वस्थ झाले नि अशा वेळी काय करावे हे मला सुचत नव्हते. पण ऐनवेळी मला बाबांच्या उदीची आठवण झाली. मी ग्लासभर पाण्यात थोडी जास्तच उदी टाकून बाबांना मनोभावाने स्मरून ते पाणी ह्यांना प्यावयास दिले अन काही वेळानेच ह्यांना खूपच समाधान लाभले व त्या दिवसापासून रोजच उदीचे पाणी आम्ही घरातील सारेजणच पिऊ लागलो आणि आश्चर्य म्हणजे लौकरच आठ-दहा दिवसात हे बरे झाले. त्यांचे दुखणे कुठल्या कुठे पळाले. आता तर पूर्वीसारखे खणखणीत बरे झाले आहेत. अशा या संजीवनी उदीचे आमच्यावर अनंत उपकार आहेत.

☆

# श्री साईनाथांचा कृपाहस्त !

▲ ▲ ▲

—श्री. आत्माराम ना. घोलेकर
गंगाराम चाळ, गौरीशंकरवाडी
घाटकोपर ( पूर्व ) मुंबई नं. ७५

जय, जयकारऽजय जयकारऽऽ
श्री साईबाबांचा बोला जय जयकार ॥ १ ॥
भगवंताने रूप घेतले
शिरडीला प्रभुसाई प्रगटले;
धन्य धन्य ती शिरडी नगरी ॥ २ ॥

मी त्यावेळी लहान होतो. गावी, भजन मेळाव्यात आम्ही मुले हे भजन, गात असू, पण त्यावेळी मला या भजनाचा अर्थ बोध होत नव्हता.

आता प्रपंचाच्या सुख दुःखात बाबांचा वरदहस्त वेळोवेळी आमच्या मस्तकी आहे. अतिसूक्ष्म वेळात बाबांचे सुखद अनुभव मला नेहमी आले आहेत; व येत आहेत.

अकल्पित अशा वेळी बाबांच्या कृपेने दोनदा शिरडी क्षेत्री जाण्याचा मला योग आला. प्रत्येक भक्ताला बाबा, आपल्यासारखे करून घेतात. चुंबकाप्रमाणे भक्ताला ते स्वतःकडे आकर्षित करतात.

बाबांनी धुनी पेटवून तयार केलेली दिव्य औषधी म्हणजे उदी. श्रद्धेने भक्ति-भावाने कोणत्याही वेळी कोठेही प्रसंगाच्या वेळी तिचा उपयोग केला तर, तिचा त्वरीत अनुभव येतो पण केव्हा ? श्री साईबाबांवर श्रद्धा असेल तेव्हाच.

श्रीसाईकृपेमुळे मला दोन मुले आहेत. मोठी मुलगी वय अडीच वर्षे; व मुलगा, सात महिन्याचा दोघांचेही जन्मावर गुरुवार मुलाला जन्मानंतर सातव्या दिवशी हॉस्पिटलमधून घरी आणले पण ? त्याच्या चेहऱ्यावर पाहून माझ्या मनात संशयाने काहूर माजले, कारण : त्यांचे सर्व अंग; डोळे, पिवळे धर्द दिसत होता. त्याचवेळी हॉस्पिटलमध्ये एक, दोन मुलांना कावीळ झाली होती. त्यामुळे आम्हा उभयतांच्या मनात संशय आला संमहाला बाबांची दिव्य औषदी उदी होतीच ? श्रीबाबांना विन-

वणी करून निश्चिंतपणे उदी मुलाला लावली. त्यानंतर उदीचा प्रयोग चालूच ठेवला आम्ही उभयतांनी बाबांना हात जोडून विनवणी केली, बाबा! जर तसेकाय, असेल तर आमच्या मनातील चिंता दूर करा. मी साईलीला मासिकात माझा अनुभव प्रसिद्ध करीन. बाबांनी आमची हाक ऐकून आम्हाला ओ दिली व आमच्या मनातील संशय दूर केला. यात काय गौड बंगाल असेल ते बाबाच जाणोत. पण उदीमुळे हा चमत्कार झाला असेच मी म्हणेन. त्या आनंदाने मी प्रफुल्लीत होऊन श्री बाबांना म्हटले बाबा, तुम्ही असेच आमच्या पाठीशी राहा आम्हा अनाथांना तुमच्या वाचून कोण तारणार? तुमचे कृपाशिर्वाद असेच आमच्या माथी असू देत. श्री साईचरणी आमचे अनंत प्रणाम.

'कधीही वाईट आणू नये मनी'
'श्री साईबाबा सदा सर्व असतो ध्यानी'

●

## साईनिकेतनची गुरुपौर्णिमा

दादर साईनिकेतन येथील संस्थानच्या मुंबई कार्यालयात गुरुपौर्णिमा उत्सव दिनांक १७-७-८१ रोजी उत्साहाने साजरा करण्यात आला. सकाळी ८ वाजल्या पासूनच भक्तांची दर्शनासाठी येजा सुरू झाली दुपारी १२ वा. बाबांची आरती झाल्यावर कु. जयश्री बेलसरे यांचे सुश्राव्य गायन झाले. त्यांनी बाबांची भक्तीगीते गायिली. यानंतर साईभक्त श्री. विजय हजारे हे येत्या दिवाळीत 'साईकृपा' नावाचा श्रीसाईबाबा साहित्य विषयक खास अंक प्रकाशित करीत आहेत तेव्हा लेखक-कवींनी आपापले साहित्य कृपाश्रू प्रकाशन, सी/६ गुंफादर्शन, १ ला कार्टररस्ता, बोरीवली (पूर्व) मुंबई ६६ येथे त्वरेने पाठवावे असे आवाहन करण्यात आले. अंकासाठी आलेली काही हस्तलिखिते याप्रसंगी श्रीबाबांच्या चरणावर ठेवण्यात आली.

कामाचा दिवस असूनसुद्धा 'साई निकेतन' सायं. ७-३० वाजे पर्यंत भक्तांसाठी खुले ठेवण्यात आले होते. सुमारे १५०० भक्तांनी या प्रसंगी श्रीबाबांचा दर्शन लाभ घेतला.

# तुमचे श्री साईबाबांबद्दल सामान्यज्ञान किती आहे ?

—कु. शालिनी सदाशिव देशपांडे
११ रामदास कॉलनी
जळगाव जि. जळगाव पिन नं. ४२५००२

१) बापू तुजला पूर्वी दोन । दिधलेती त्या त्यात हे तीन, ठेवून त्यांचे करी पूजन । कृत कल्याण होशील ॥ असे बाबा......यांना म्हणाले होते.
अ) म्हाळसापती, ब) कोते, क) पितळे, ड) शामा.

२) हो, हो प्रकटेल विठ्ठलमूर्ती । भक्त भावार्थी पाहिजे । असे बाबा...... यांना म्हणाले होते.
अ) शामा ब) हेमाडपंत क) कोते ड) दासगणू.

३) राग तयाचा मोठा कडक । येताचि होईल लालभडक, जा निघून जा की तडक । धरा कि सडक शिरडीची । असे बाबा......यांना उद्देशून म्हणाले होते.
अ) रोहिला, ब) बडे बाबा, क) जव्हार अल्ली, ड) चांदोरकर.

३) काय करावे आई आज । गेलो मी वांद्यास जैसा रोज नाही खावया पावया पेज । उपाशी मज यावे लागले । असे बाबा......यांना म्हणाले होते.
अ) सौ. देव, ब) सौ. तर्खड, क) सौ. पितळे, ड) सौ. गव्हाणकर.

५) आम्ही गंधाचा उलासा टिळा । लावू आता आपुलिया निढळा स्पर्श करू द्या ना कपाळा । आणि हे सकळा काय घडले ॥ असे......बाबांना म्हणाले होते.
अ) नूलकर, ब) दादाशट, क) डॉ. पंडित, ड) नाना रासने.

६) बुद्धेपणाच्या तोरा दाविसी, ऐसेचि काय तू कुराण पढसी । मक्का केल्याचा ताठा वाहसी, परि न जाणसी तू मात्रे ॥ असे बाबा......यास म्हणाले होते.
अ) बडेबाबा, ब) फाळके, क) जव्हार अली, ड) म्हाळसापती.

७) दहिभाताचे काही कवळ, लक्ष्मी आईच्या देवळाजवळ काळया कुत्र्यास घाल घाल, बरा होशिल तात्काळ ॥ असे बाबांनी......यांना सांगितले.
अ) भीमाजी पाटील ब) बाळा शिंपी क) नूलकर, ड) आप्पा जागले.

८) तीन रुपये चौदा आणे। त्या मज दिधले ते मी जाणे, बाकी जे आणिले मजकारणे। ते मज दक्षिणे देई गा ॥ असे बाबांनी......यास सांगितले.

अ) डॉ. पिल्ले, ब) रतनजी, क) शामा, ड) नूलकर.

९) चढू नकोस भटुरड्या वर। चढशील तर खबरदार चल नीघ जा खाली उतर। असे बाबा......यांस म्हणाले होते.

अ) शामास, ब) हेमाडपंतांस, क) मिरिकरांस, ड) सर्पास.

१०) आता काऊ येऊन टोचील। मग तू होशील चांगला ॥ अशी समजूत बाबांनी......यांची घातली.

अ) शामा, ब) मिरिकर, क) डॉ. पिल्ले, ड) कोते.

उत्तरे :

१) क, २) ड, ३) क, ४) ब, ५) ब, ६) ब, ७) ब, ८) ब, ९) ड, १०) क

# श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

## ६३ वा पुण्यतिथी महोत्सव

### जाहीर आमंत्रण

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे श्रीसाईबाबा पुण्यतिथी महोत्सव येत्या विजया दशमीस बुधवार दिनांक ७ ऑक्टोबर ते शनिवार दिनांक १० ऑक्टोबर १९८१ पर्यंत शिर्डीस साजरा होत आहे तरी श्रीसाईभक्तांनी हेच निमंत्रण समजून उत्सवास हजर राहून सर्वतोपरीने सहकार्य द्यावे अशी विनंती श्री. क. हि. काकरेसाहेब कोर्ट रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी हे करतात.

# बाबांच्या कृपेने ऑपरेशन टळले!

— सौ. शीला मधुसूदन नाईक
३ब/११९, शक्तियोगे सोसायटी,
वजीरा नाका, बोरीवली (प.)
मुं. ४०००९२

● साधारण २॥ ते ३ वर्षापूर्वीची गोष्ट असेल, माझ्या यजमानांना शिरेचे दुखणे सुरू झाले. पुष्कळ उपचार केले पण काही गुण येईना. डॉक्टर म्हणाले, ऑपरेशन करावे लागेल. आम्ही खूप घाबरून गेलो. शेवटी ह्यांच्या एका डॉक्टर मित्राच्या ओळखीने जे. जे. हॉस्पिटलमध्ये सर्जनकडून तपासून घेण्याचे ठरले. तपासणीचा दिवस ठरला व त्याप्रमाणे माझे यजमान व मित्र दोघे हॉस्पिटलमध्ये गेले. तो दिवस होता गुरुवार. त्यावेळी मी दर गुरुवारी श्रीसाईबाबांच्या मंदिरात जात असे. त्या दिवशी नेहमीप्रमाणे मी मंदिरात गेले व तेथील उदी श्री बाबांच्या पायाला लावून म्हणाले, बाबा, ही उदी मी रोज त्यांना सेवन करण्यास देईन. दुखणे ऑपरेशनविना बरे होईल असा रिपोर्ट मिळू द्या आणि असे झाल्यास हा अनुभव मी 'श्री साई-लीले'त प्रसिद्ध करीन.

आणि आश्चर्य म्हणजे मी बाबांना जे सांगितले तेच डॉक्टरांनी आम्हाला सांगितले की, ऑपरेशनची जरूरी नाही.

अशा प्रकारे श्रीसाईबाबांच्या कृपेने ऑपरेशन टळले. त्यानंतर जवळ जवळ तीन महिने बाबांची उदी व डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे घेतल्यानंतर १००% गुण आला.

अशी ही बाबांची लीला अगाध आहे. आणि मी नवस बोलल्याप्रमाणे उशीरा का होईना बाबांची क्षमा मागून हा अनुभव श्रीसाईलीला मासिकात प्रसिद्ध करीत आहे.

अशा या थोर श्री बाबांस माझे बहुत प्रणाम !

●

# बाबा सदैव भक्तांचे पाठीराखे

—श्री. सी. बी. पाटील
व्हिक्टरी को-ऑ. सो.
हिल रोड, बांद्रा, मुं. ४०००५०

● साईबाबांची भक्ती मी साधारणपणे १९५१ ते १९५२ सालापासून करावयास लागलो. प्रथम माझ्या मित्राबरोबर १९५२ च्या सुमारास शिर्डीस जाण्याचा योग आला. नंतर स. १९५८ ला दुसऱ्यांदा शिर्डीस गेलो. स. इ. १९५९ पासून बाबांची आरती व पोथी वाचन करू लागलो ते आजतागायत.

संसारात मानव कधीच स्थिर नसतो. या नाही त्या आपत्तीला त्याला सामोरे जावे लागते, व बऱ्याचवेळा निराशा पदरात पडते. माझा असा अनुभव आहे की, जर मानवाने भक्तिमार्गाचा स्वीकार केला तर निश्चितच सर्व संकटातून त्याची मुक्तता होईल नाहीतर जीवन खडतर भोगावे लागेल. मलासुद्धा अशा कित्येक प्रसंगाना तोंड द्यावे लागले. परंतु बाबांची भक्ती व नामस्मरण यामुळे पुष्कळ प्रसंगाना धैर्याने सामोरे जाता आले व त्यातून सुटका झाली.

मला येथे एक असा बिकट प्रसंग सांगावयाचा आहे. दिनांक १४–८–१९८० रोजी माझी मुलगी कु. सुनिता वय वर्षे २३ ही पोटदुखीच्या दुखण्याने आजारी झाली. घरातील प्रथमोपचार सुरू झाले. वाटले, बाबांची उदी दिली की बरं होईल थोड्या वेळाने. परंतु काही केल्या गुण येईना. शेवटी डॉक्टरना घरी आणले. त्यांनी तपासून इंजेक्शन, गोळ्या दिल्या. त्याचाही काही परिणाम झाला नाही. दुखणं वाढतच गेलं. तो दिवस कसातरी गेला. दुसरा दिवस १५ ऑगस्ट. डॉक्टरना सकाळीच ६ वा. बोलावले. परत त्यांनी बदलून औषध व इंजेक्शन दिले. दुपारी नाइलाजाने हॉस्पिटलमध्ये जाण्याचा कटु निर्णय घेण्यात आला. काहीच सुचेना व डोकं सुन्न झालं. बाबांना प्रार्थना केली की, हे दयाघना, दिनदयाळा, ज्या ज्या वेळी मी तुमचा धावा करतो त्या त्या वेळी आपण माझ्या हाकेला धावून आला. आता असा का विलंब करता. आपल्या कृपेशिवाय सर्व व्यर्थ आहे. १ वाजता बाबांना सांगून हॉस्पिटलमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. डोळ्यात आसवे आली. बाबांची परवानगी घेतली व नानावटी ( सांताक्रुझ ) हॉस्पिटलमध्ये जाण्याचे ठरविले. परंतु मला स्वतःला तेथे जाणे योग्य वाटत नव्हते. शिवाय सार्वजनिक सुटी, तेथे डॉक्टर मिळणे कठीण. तत्काळ मुलगा कु. मिलींद याला बाबांच्या बांद्रा येथील द्वारकामाईत पाठविले. तेथे असलेले बाबांचे परमभक्त श्री. रामभाऊ देसाई यांना बाबांना प्रार्थना करण्यास सांग व माझे मित्र श्री. शरद सावंत त्याच इमारतीत राहतात ते असल्यास बोलावून आणणे. तेही बाबांचे भक्त आहेत. यांनी व डॉ. भट, माटुंगा, मुं. यांची चांगली

ओळख आहे. ते ताबडतोब आले. त्यांनी डॉ. भट यांना फोन केला व त्यांनी डॉ. खांडेपारकर क्लिनिक, हिंदू कॉलनी येथे पेशंटला आणण्यास सांगितले. बाबांनी माझी हाक ऐकली. आम्ही तावडतोब तेथे ॲडमिशन घेतली. संध्याकाळी ४॥ वा. डॉ. भट यांनी येऊन मुलीला तपासले व सलाईन वगैरे उपचार ताबडतोब सुरू केले. येथे एक नमूद करावेसे वाटते की, क्लिनिकमध्ये गेल्याबरोबर गुण येण्यास सुरुवात झाली ही बाबांची कृपाच, व आश्चर्य म्हणजे डॉ. भट यांनी तपासुन औषधोपचार सुरू करताच पोटदुखी बंद झाली. हळू हळू आराम पडत गेला. रात्री २ वाजेपर्यंत सलाईन दिले. मी तोपर्यंत बाबांचा जप करीत होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलगी पूर्ण बरी झाली. डॉक्टरांच्या सल्याप्रमाणे पोटाचे फोटो काढले, परंतु त्यात काहीच आढळले नाही. त्याच दिवशी संध्याकाळी ५ वा. डॉ. भट यांनी परत तपासणी केली व सांगितले की, ही मुलगी आता पूर्ण बरी झाली, हिला घरी घेऊन जा. आम्हा सर्वांना व मित्रमंडळींना आनंद झाला व आम्ही घरी आलो. सर्व रहिवाशी आश्चर्यचकित झाले.

मी बाबांची ६॥ ची सायं. आरती मनोभावे केली व बाबांना सांगितले की, आपल्या आशिर्वादाने सर्व काही ठीक झाले व परत बाबांची करुणा भाकली. मी हॉस्पिटलमध्ये जाण्यापूर्वी बाबांना प्रार्थना केली होती की, "बाबा गुण द्या" व बरे वाटल्यावर मी सर्व वृत्तांत साईलीला मासिकामध्ये देईन. मला हे निवेदन देण्यास फारच विलंब झाला आहे तरी त्याबद्दल बाबांची क्षमा मागितली व पुढे लिखाण सुरू केले बाबांच्या बांद्रा येथील द्वारकामाईत.

बाबा, भक्तांच्या पाठीशी सदैव असतात व संकटसमयी धावा केल्यावर प्रकट होतात, याचा अनुभव मला बऱ्याच वेळा आला आहे यात शंका नाहीच.

▲

## 'शिरडीचे श्रीसाईबाबा'चा १५० वा प्रयोग

संपूर्ण महाराष्ट्रात दीड लाखावर साई भक्तांनी पाहून प्रशंसा केलेल्या आरती थिएटर्स निर्मित "शिरडीचे श्रीसाईबाबा" या नाटकाचा १५० वा प्रयोग महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननिय श्री. ए. आर. अंतुले यांच्या खास उपस्थितीत सोमवार दि. २१ सप्टेंबर ८१ रोजी रात्री ८॥ वाजता शिवाजी मंदीर दादर येथे साजरा होणार आहे. नेहमी प्रमाणे सर्व साईभक्तांनी आपली उपस्थिती द्यावी. अशी विनंती निर्माते कुमारसेन गुप्ते यांनी केली आहे.

# शिरडी-वृत्त माहे जुलै १९८१

## गुरुपौर्णिमा उत्सव

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता आलेल्या साईभक्तांची व श्रीसाईबाबांचे दर्शनाकरिता पंढरपूर यात्रेस जाणारे व पंढरपूरहून येणारे अशा साईभक्तांची फारच गर्दी झाली होती. हा उत्सव गुरुवार दि. १६-७-८१ ते शनिवार दि. १८-७-८१ पर्यंत श्रींच्या समाधि मंदिरात मोठ्या थाटात साजरा झाला. नामांकीत कलाकार श्री. भार्गवराम आचरेकर, श्री. जयवंत कुलकर्णी, कु. श्रीकला हतंगडी, श्री. अप्पा सामंत, श्री. बंडोपंत सोलापूरकर, श्री. वसंतराव देवळणकर, श्री. चंद्रशेखर गाडगीळ, श्री. शामसुंदर मेहता, डॉ. वसंतराव देशपांडे, सौ. अनुराधा पौडवाल वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या व ह. भ. प. कविश्वर बुवा यांचे कीर्तन झाले.

गुरुपौर्णिमा उत्सव : पहिला दिवस : गुरवार दि. १६-७-८१ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. गुरुवार महाबाचा दिवस असल्यामुळे गर्दी फार होती. सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरवात झाली. श्रींचे मंगलस्नान अभिषेक पूजा आरती नित्याचे कार्यक्रम झाल्यावर दुपारी ४-३० ते सायंकाळी ६-३० पर्यंत. श्री. कृष्ण यशवंत कविश्वर बुवा मुंबई यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. रात्री ७-३० ते ९ व ९-३० ते ११ पर्यंत श्री. भार्गवराम आचरेकर रेडिओस्टार पुणे यांचे गायन झाले. रात्री ९-१५ वा. श्रींच्या पालखीची मिरवणूक निघाली. ११-३० वा पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

उत्सवाचा मुख्य दिवस : शुक्रवार दि. १७-७-८१ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे साईभक्तांची गर्दी बरीच होती. ५-३० वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची अध्याय वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधी मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्याचे कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४-३० ते सायंकाळी ६-३० पर्यंत ह. भ. प. श्री. कविश्वरबुवा यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी ७ वा. धुपारती झाल्यावर रात्री ९-१५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक समाधि मंदिरातून बाबांच्या गजरात निघाली. सनई, चौघडा, टाळ, मृदंग, भजन, राहाता बॅण्ड पथक, पुणे येथील मयूर ब्रास बॅण्ड पथक, डफ, ढोल मोठ्या थाटात लाईटने सुशोभित केलेला रथ संस्थानचे गुरुस्थान नजिक आला.

त्या ठिकाणी संस्थान कर्मचारी व ग्रामस्थ लोकांनी भारुड गारुड कार्यक्रम केले. पुण्याचे नकलाकार श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर यांनी नकलाचे कार्यक्रम केले. त्यानंतर मिरवणूक रात्री १२-३० वाजता मंदिरात आली व मिरवणुकीतील लोक कलाकारांच्या कार्यक्रमात सामील झाले. साईभक्तांना श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

उत्सवाचा ३ रा दिवस :– शनिवार दि. १८-७-८१ रोजी सकाळी ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी ७-३० ते ८-३० पर्यंत गुरुस्थान ठिकाणी रुद्राभिषेक झाला. १०-४५ ते १२ पर्यंत संस्थान कीर्तनकार श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांचे काल्याकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली, व साईभक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्री ७-३० ते १० वा. पर्यंत डॉ. वसंतराव देशपांडे रेडिओस्टार पुणे यांचे गायन झाले. त्यानंतर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे–

कीर्तन :– १) श्री. ग. वि. जोशी, शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह. भ. प. श्रीकृष्ण यशवंत कवीश्वर बुवा मुंबई यांची गुरुपौर्णिमा उत्सवात कीर्तने झाली.

३) श्रीमती शांताबाई बी. निकम मुंबई

४) श्री. आप्पासाहेब थोरात उक्कलगाव ता. श्रीरामपूर.

भजन, गायन, वादन – १) कु. मंजिरी भालचंद्र कर्वे, पुणे.
नृत्य वगैरे २) श्री. अनुराग श्रीवास्तव मुंबई

३) श्रीमती मधूचंद्रा, हैद्राबाद. ४) सर्वश्री नंदन मुंबई. ५) वसंतराव धोंडी जाधव, दादर. ६) अशोक अंबादास काळे, बार्शी. ७) पूज्य गुरुदेव भजनी मंडळ धनलपूर ८) श्रीराम विष्णू सातर्डेकर, मुंबई. ९) भार्गवराम आचरेकर, पुणे. १०) चंद्रकांत कामत, पुणे. ११) दिगंबर भातोंगे, राहता. १२) दामूअण्णा दळवी, श्रीरामपूर १३) जयवंतराव कुलकर्णी, मुंबई. १४) मल्लेश कोरस, मुंबई. १५) मनोहर कदम, मुंबई. १६) अप्पा सामंत मुंबई. १७) कु. श्रीकला हतंगडी, मुंबई. १८) अरविंद भाग्वे, मुं. १९) साळवी कोरस, मुं. २०) दादा जोशी, मुं. २१) माधवराव ग्यानुजी दैठणकर, पुणे. २२) तुकाराम माधव दैठणकर, पुणे. २३) अशोक माधवराव पुणे. २४) गजानन दत्तोबा दैठणकर, पुणे. २५) मास्तर अब्दूलकादर निसर्मा पुणे. २६) केशव बाबूराव बिडवे, संगमनेर. २७) अशोक दामू अण्णा दळवी, बेलापूर. २८)

रावसाहेब देशमुख, अमरावती. २९) मयेश जनार्दन कुलकर्णी, पुणे. ३०) कु. विजया नानासाहेब कोराटे, शिरडी. ३१) देवीदास वाघचौरे, पुणे. ३२) प्रमिलाताई पैठणकर. ३३) विमल शिर्के, जळगाव. ३४) गोविंद केशव सोनवणे, शिरुर. ३५) भाऊसाहेब गोविंद सोनवणे, शिरुर. ३६) रघूवीर शांताराम मिराणे, शिरडी. ३७) नामदेव नागू भोईर, नवघर. ३८) शाहूराम भोसले, मुं. ३९) विजया बापूराव वानी शिरडी. ४०) किलोत्तमा देवीदास देशपांडे, शुजर. ४१) रविंद्र वऱ्हाडकर मुं. ४२) रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. ४३) सौ. कमल रघुनाथ सांडभोर, पुणे. ४४) बंडोपंत सोलापूरकर, पुणे. ४५) वसंतराव देवळणकर, पुणे. ४६) चंद्रशेखर गाडगीळ पुणे. ४७) शिवराम बिडवे, संगमनेर. ४८) भागवत शैलेस ४९) शिरीष जोशी, डोंबीवली. ५०) श्यामसुंदर भेडा, संगमनेर. ५१) सूर्यकांत सीरे, मुं. ५२) लिलावती गुजराथी शिरडी. ५३) पुंडलीक दगोजी वाघ. येवला. ५४) ईश्वर पुंडलीक वाघ, येवला ५५) श्यामू पुंडलीक वाघ, येवला. ५६) सुनिल निवृत्ती वाघ, येवला. ५७) ज्ञानोबा तात्या वाडेकर, शिरडी. ५८) प्रकाश सदाशिव पवार, पुणे. ५९) सदाशिवराव जाधव सांगली. ६०) ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी. ६१) राजाभाऊ देशपांडे, पुणे. ६२) मधूकरराव सोनवणे, बडोदा. ६३) महादेव तुपे. ६४) रामभाऊ खळदकर पुणे. ६५) श्यमा खळदकर, पुणे. ६६) शरद खळदकर, पुणे. ६७) मनोहर लोणकर, पुणे. ६८) गंगाधर जाधव, पुणे. ६९) एस. एस. साठे दौंड. ७०) ज्ञानोबा तात्याबा जाधव, पुणे. ७१) मयूर ब्रासबँड, मालक चंद्रकांत आढाव, पुणे. ७२) गणपत बारसकर, पुणे. ७३) श्रावण गायकवाड, पुणे. ७४) सदानंद गोडबोले, पुणे. ७५) पर्वता कांबळे पुणे. ७६) अशोक आढाव, पुणे. ७७) चंदू आढाव, पुणे. ७८) राजेंद्र आढाव, पुणे. ७९) राजाराम माधव, पुणे. ८०) राजेंद्र ज्ञानेश्वर पुणे. ८१) इसाक शेख, पुणे ८२) विजय बेडे, पुणे. ८३) अनिल आढाव, पुणे. ८४) राजूकाका पुणे. ८५) ...लीर शेख पुणे. ८६) नागेश गंगाधर दिवाकर पुणे. ८७) बाळासाहेब बिडवे. पुणे. ८८) पद्माकर बिडवे, पुणे. ८९) प्रसाद बिडवे, हुडे पुणे. ९०) चंद्रकांत लोणकर, पुणे. ९१) सुरेश लोणकर, पुणे. ९२) सखाराम राघुजी गुरव, कोपरगाव. ९३) वसंत दामोदर रासने, पुणे. ९४) दत्तात्रय दामोदर रासने, पुणे. ९५) न्यु गंधर्व ब्रास बॅन्ड पुणे. ९६) ह. भ. प. श्रीकृष्ण यशवंत कवीश्वर बुवा, मुं. ९७) सौ. इंदूमती कृष्णराव कवीश्वर मुं. ९८) शशीकांत ए. दळवी, मुं. ९९) बारावकर ब्रदर्स, शिरडी. १००) ...श रा. आंजलेकर, मुं. १०१) रघुनाथ नागरे, शिरडी. १०२) विलास रा. महा...के, मुं. १०३) श्याम मिराणे, शिरडी. १०४) विलास परळकर, मुं. १०५) ...र्धन नागरे, शिरडी. १०६) डॉ. वसंतराव देशपांडे, पुणे. १०७) सौ. देशपांडे, पुणे. १०८) प्रदिप त्र्यंबक रासने, अहमदनगर. १०९) शिवाजी तुकाराम घुमाळ,

शिरडी. ११०) सौ. अनुराधा पौडवाल, मुं. १११) नारायण विठ्ठल सुतार, आचीरणी ११२) श्री. भजनी मंडळ कच्चीयाना जबलपूर. ११३) बाळासाहेब कुलकर्णी, सावळविहीर. ११४) अमरेंद्र नायडू, गुंटकल. ११५) दत्तू शंकर डुंगरे, खेडलाझुंगे.

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पावसाचे प्रमाण कमी आहे त्यामुळे ठराविक वेळेतच पाणी पुरवठा केला जातो.

★

Books on Saibaba are coming one after the other, yet.

# "A MISSION DIVINE·!"

## " मशिदीत प्रगटला परमेश्वर ! "

have no parallel, Mr. Anant Pai kane of Goa has rightly said in his letter : '–I have read many books on Sai Baba. 'Sai Satcharit' I have perused atleast four or five times. But the way you have unrolled the life-story of Sai Baba in a well conjoined manner has no parallel. You have very consistently, beautifully and easily linked the events which imprint a deep impression on the reader's mind who at its end becomes conscious of the SELF within himself.' But this bliss divine for mere Rs. 45/– and Rs. 36/– respectively. postage Rs. 4·50 each.

**PRASHANTI PRAKASHAN, 5 Vasant Apartments,
47 Kastur Park, Shimpoli Road, Borivali (W),
Bombay 400 092.**